श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे
(जैन अल्पसंख्यांक संस्था)



# श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय,

नॅक "B" दर्जा | कडा, ता. आष्टी, जि. बीड | ISO 9001 : 2008



# अमोलक

## महिला सन्मान विशेषांक २०२२-२०२३




## तिरंग्याच्या निर्मितीसाठी

# ज्यांचा सदैव ऋणी आहे हा देश

तिरंगा -भारताचा राष्ट्रध्वज.तीन रंगांनी सजलेला हा तिरंगा केवळ एक झेंडा नाही तर तो भारत देशाची आन-बान आणि शान आहे.हा तिरंगा म्हणजे 130 कोटींहून अधिक भारतीयांमध्ये असलेले साहस, शौर्य,अभिमान, आकांक्षा आणि पवित्रतेचे प्रतीक देखील आहे. मात्र, सर्वात आधीच्या काळात आपल्या ध्वजाचे रूप असे नव्हते. वेळोवेळी यात अनेक बदल करण्यात आले. आज आपला तिरंगा ज्या स्वरुपात आहे त्याचे जनक आहेत पिंगळी वेंकैय्या. 2 ऑगस्ट 1876 रोजी आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्ह्याजवळच्या एका गावात जन्मलेल्या पिंगळी वेंकैय्या यांच्याकडे खुद्द महात्मा गांधीजींनीच राष्ट्रध्वज तयार करण्याचे काम दिले होते. त्यांनी 1921 मध्ये राष्ट्रध्वज तयार केला. 1931 साली या ध्वजाच्या स्वरुपात काही सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर 22 जुलै 1947 रोजी आपला राष्ट्रध्वज मूळ रुपात स्वीकारण्यात आला.

## अशी होती तिरंग्याची विकासयात्रा



श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

## श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड

# अमोलक

महिला सन्मान विशेषांक

२०२२-२३

*** प्राचार्य ***

डॉ. एन. एस. राठी

*** संपादक ***

प्रा. सुनिता बोम्बे

*** विभागीय संपादक ***

प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख * प्रा.डॉ. योगेश रसाळ

# अमोलक

## महिला सन्मान विशेषांक
## २०२२-२३

*** प्रकाशक ***

डॉ. एन. एस. राठी
प्राचार्य

*** संपादक ***

**प्रा. सुनिता बोम्बे**

*** मुद्रक ***

भक्ती आर्टस्, अहमदनगर

*** मुखपृष्ठ संकल्पना ***

प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख
रसायनशास्त्र विभाग प्रमुख

*** प्रकाशन काळ ***

वार्षिक

*** प्रकाशन स्थळ ***

श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे
श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला,
अमोलक विज्ञान व पनालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय,
कडा, ता. आष्टी, जि. बीड

(खाजगी वितरणासाठी विक्रीसाठी नाही.)



# प्राचार्यांचे मनोगत

गांधी महाविद्यालयाचा 'महिला सन्मान विशेषांक' वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. महाराष्ट्र शासनाने देखील २०२२-२३ हे वर्ष महिलांसाठी स्त्री सन्मान वर्ष म्हणून जाहीर केले आहे.

''स्त्री म्हणजे वात्सल्य
स्त्री म्हणजे मंगल्य
स्त्री म्हणजे मातृत्व
स्त्री म्हणजे कर्तृत्व''

प्राचीन भारतीय धर्म ग्रंथात देखील स्त्रियांच्या सन्मानाला विशेष महत्त्व दिलेले आढळते. भारतीय संस्कृती व परंपरेत महिलांचे विशेष स्थान आहे. आजच्या युगात महिला सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आहेत. आजच्या स्त्रीचे कार्यक्षेत्र मर्यादित राहिलेले नाही. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही तिने आपली क्षमता सिद्ध केली आहे. स्त्रीमध्ये अफाट शक्ती, क्षमता व सामर्थ्य सामावले आहे. स्त्री आपले मूल संस्कारक्षम घडावे म्हणून जीवाचे रान करते. जगातील अनेक महापुरुष हे आई, गुरु, पत्नी, मैत्रीण अशा अनेक स्त्रीरुपी प्रयोगशाळेत तयार झालेले आढळते. ईश्वराने दिलेल्या क्षमतांचा योग्य वापर करून संस्कारक्षम पिढी घडवण्याचे सामर्थ्य फक्त स्त्रियांमध्येच आहे. महिलांना आजही आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. सर्वांनी मिळून महिलांबद्दलची विचारसरणी बदलली पाहिजे. महिलांचा आदर करण्यासाठी आपल्याला वेगळे काही करण्याची गरज नाही. त्यांना आदर व सन्मान दिला तरीही आजची सामाजिक परिस्थिती बदलण्यास वेळ लागणार नाही.

''स्त्री ही वार नाही तलवार आहे
ती समशेरीची धार आहे
स्त्री ही अबला नाही
तर ती धगधगता अंगार आहे''

**डॉ. नंदकुमार राठी**
प्राचार्य
गांधी महाविद्यालय, कडा



# मनोगत

आपल्या महाविद्यालयाचा 'अमोलक–महिला सन्मान विशेषांक' प्रकाशित होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी हे तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे राहून जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असतात. ध्येयप्राप्तीसाठी अथक परिश्रमांची जोड देणे आवश्यक आहे. यशस्वी लोक आणि अयशस्वी लोकांमध्ये छोटासा फरक आहे. जगातील सर्व यशस्वी लोकांच्या यशाचे एकच रहस्य आहे, निरंतर मेहनत आणि धैर्य. सुप्रसिद्ध लेखक शिव खेरा यांनी सांगितले आहे Winners don't do different things, they do things differently.... मित्रांनो, जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रचंड कष्ट करा, व शारीरिक आणि मानसिक ताकद प्राप्त करा. यशस्वी लोकांना आदर्श मानून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेऊन अयशस्वी लोकांचा देखील अभ्यास करा, कारण इतरांच्या चुकांमधून आपल्याला अनेक गोष्टी अवगत होतात.

जगामध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही आहे जी मनुष्य साध्य करू शकत नाही. फक्त आपण जे काही ध्येय स्वतःसाठी पाहत आहोत ते साध्य करण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजे. जर तुम्ही ध्येयासाठी सतत प्रयत्नशील असाल आणि धैर्य न गमावता प्रयत्न करत असाल, तर एका नवीन दिवशी नक्कीच आपल्याला यश प्राप्त होईल. आपले लक्ष्य साध्य करण्याच्या प्रयत्नात अनेकदा असे होते कि आपण आपले धैर्य गमावू लागतो. अशी वेळी स्वप्रेरणादायी असा स्वसंवाद करा. प्रत्येक क्षणाला आत्मपरीक्षण करण्याची सवय लावून घेतली तर जीवनात यश तुमचेच आहे यावर विश्वास ठेवा.

यशस्वी व्हायचं असेल तर, सुरुवात एकट्यानेच करावी लागते !! जेव्हा तुम्ही जिंकू लागता; तेव्हा लोक आपोआप तुमच्या मागे येतात.. कारण धावत्याला शक्ती येते आणि रस्ता सापडतोच....

सर्वांना यशस्वी वाटचालीसाठी माझ्या अनेकानेक हार्दिक शुभेच्छा...

**श्री. हेमंतकुमारजी पोखरणा**

**प्रधानमंत्री, श्री अमोलक जैन**

**विद्या प्रसारक मंडळ, कडा**



हिंदवी स्वराज्य संस्थापक

**श्री छत्रपती शिवाजी महाराज**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**



# संपादकीय...

अमोलक हा महिला विशेष अंक वाचकांसाठी देतांना मनस्वी आनंद होत आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी असे म्हटले जाते. जगाचा उद्धार करण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये आहे. विश्वाची निर्मिती महिलाच करीत असून महिलांनी जमिनीचा. शेतीचा शोध देखील लावलेला आहे. म्हणून असे म्हटले जाते, नारीकी निंदा मत करो, नारी नरकी खान, उनकी कोकसे पैदा हुए राम, कृष्ण और हनुमान, परिणामी महिलांना जगत जननी असे म्हटले आहे. महिला या शब्दाचा अर्थ म म्हणजे महत्वकांक्षी, ही म्हणजे हिम्मतवान, ला म्हणजे लाजवंती. महिला या शब्दातच साऱ्या जगाचे सामर्थ्य साठलेले आहे. वरील शब्दांवरून महिलांचे महत्त्व लक्षात येते. ती सर्वांचे उदरभरण करते. ती धरित्री महिलेचे स्वरूप आहे. म्हणून एका कवीने म्हटलेले आहे

गे माय भू, तुझे मी फेडीन पांग सारे ।
आणिन आरतीला हे चंद्र, सूर्य, तारे ।।

आज भारताचा विचार केला असता प्रत्येक क्षेत्रात महिलांचा समावेश दिसून येतो. एका तत्त्ववेत्याने म्हटले आहे धरित्रीचा कागद आणि समुद्राची शाई केली तरी समग्र महिलांची महती वर्णन करता येणार नाही. अशा सामर्थ्यवान, महत्त्वाकांक्षी, जगदोधारी सर्व महिलांविषयी मी फार काही वर्णन न करता येथेच तात्पुरता विराम घेते धन्यवाद !

**प्राध्यापक सुनिता दत्तात्रय बोम्बे**
संपादिका, अमोलक महिला विशेषांक
२०२२–२०२३
गांधी महाविद्यालय, कडा

# श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

## * विश्वस्त मंडळ *



**श्री. गोकुळदासजी मेहेर**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. बाबुलालजी भंडारी**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. दिलीपकुमारजी बाफना**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. पोपटलालजी भळगट**
विश्वस्त अध्यक्ष



**श्री. दिलीपकुमारजी पटवा**
विश्वस्त अध्यक्ष

## * कार्यकारी मंडळ *



**श्री. योगेशकुमारजी भंडारी**
अध्यक्ष



**श्री. कांतीलालजी चाणोदिया**
कार्याध्यक्ष



**श्री. अनिलकुमारजी झाडमुथ्था**
उपाध्यक्ष



**श्री. बिपीनकुमारजी भंडारी**
उपाध्यक्ष



**श्री. हेमंतकुमारजी पोखरणा**
प्रधानमंत्री



**डॉ. महेंद्रकुमारजी पटवा**
मानद मंत्री



**श्री. विनोदकुमारजी बलदोटा**
मानदमंत्री



**डॉ. उमेशकुमारजी गांधी**
कोषाध्यक्ष

# श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

## * कार्यकारी मंडळ *



**श्री. रमेशलालजी गुगळे**
कार्यकारी सदस्य



**श्री. संजयकुमारजी मेहेर**
कार्यकारी सदस्य



**श्री. योगेशकुमारजी चाणोदिया**
कार्यकारी सदस्य



**श्री. संजयकुमारजी कोठारी**
कार्यकारी सदस्य



**डॉ. प्रमोदकुमारजी भळगट**
कार्यकारी सदस्य



**श्री. प्रफुलकुमारजी पोखर्णा**
कार्यकारी सदस्य



**श्री. संजयकुमारजी भंडारी**
कार्यकारी सदस्य



**श्री. संतोषलालजी गांधी**
कार्यकारी सदस्य



**श्री. संतोषलालजी भंडारी**
कार्यकारी सदस्य



**श्री. अमोलकुमारजी पटवा**
कार्यकारी सदस्य



**श्री. वसंतलालजी चोरबेले**
कार्यकारी सदस्य



**श्री. अनिललालजी मेहेर**
कार्यकारी सदस्य



**श्री. अजयकुमारजी चोरबेले**
कार्यकारी सदस्य



**श्री. ललीतकुमारजी कटारिया**
कार्यकारी सदस्य

# श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,

## ✻ संपादक मंडळ ✻



प्राचार्य डॉ. एन.एस राठी

अध्यक्ष



उपप्राचार्य डॉ. ज.मो. भंडारी



प्रा. सुनिता बोम्बे

संपादक



प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख

सह–संपादक



प्रा.डॉ. योगेश रसाळ

सदस्य



प्राचार्य डॉ. एन.एस राठी, उपप्राचार्य डॉ. ज.मो. भंडारी व सर्व कर्मचारी वृंद

# ❋ महाविद्यालयीन उपक्रम ❋



हर घर तिरंगा अभियान



हर घर तिरंगा अभियान



रसायनशास्त्र विभाग व महाविद्यालयातर्फे आयोजित हर घर तिरंगा अभियान



रसायनशास्त्र विभागा माजी विद्यार्थी संघातर्फे महाविद्यालयास जैन धर्म उद्धारक चोवीस तीर्थंकर गोल्डन फ्रेम फोटो भेट



रसायनशास्त्र विभागास माजी विद्यार्थी संघातर्फे संगणक व प्रिंटर भेट देण्यात आली. उद्घाटन करताना प्राचार्य डॉ नंदकुमार राठी व उपप्राचार्य डॉ जे. एम. भंडार, विभाग प्रमुख डॉ. देशमुख व विभागाचा स्टाफ



अमोलक- देवराई वर्धापनदिन सोहळा



आष्टी तालुक्यातील देवी-निमगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद आणि कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमलोक विज्ञान, आणि पन्नालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी ग्रामस्वच्छता मोहीम, प्लास्टिक मुक्ती मोहीम, मतदानाविषयी जनजागृती, पर्यावरण जनजागृती इत्यादी कार्य केले. त्याचबरोबर तज्ज्ञांनी गावामध्ये बालविवाह विषयक, जलसंधारणाचे महत्त्व इत्यादीं बद्दल ग्रामस्थांना मार्गदर्शन केले इत्यादी कार्य केले.छाया:शरद गर्जे

# ✻ महाविद्यालयीन उपक्रम ✻



राष्ट्रीय सेवा योजना आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी
श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडाळाचे सर्व मान्यवर
पदाधिकारी प्राचार्य डॉ. एन.एस. राठी व उपप्राचार्य डॉ. ज.मो. भंडारी



राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे उद्घाटन समारंभ





राष्ट्रीय सेवा योजना शिबीरांतर्गत रामगड येथील ग्रामस्वच्छता करताना विद्यार्थी







वन्यजीव संरक्षण सप्ताह प्रसंगी व्याख्यान करतांना डॉ. एस.डी. ओव्हळ

# ✻ महाविद्यालयीन उपक्रम ✻







प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विषयांवरील कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी डॉ. डी.एन. मोरे इंग्लिश पिपल्स कॉलेज, नांदेड यांचे व्याख्यान प्रसंगी उपस्थित संस्थेचे सर्व मान्यवर



प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित पक्षीदिनानिमित्त डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांचे व्याख्यान



आंतरराष्ट्रीय क्षयरोगदिनानिमित्त प्राणीशास्त्र विभागातील डॉ. सुदाम जाधव व्याख्यान देतांना



State Government Schemes for Citizens

डॉ. शामरावजी भनगे धामणगावकर दैनिक लोकप्रभाचे उपसंपादक यांचे व्याख्याने प्रसंगी संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सुवर्ण पदक विजेते बास्केट बॉल टिम अंतर्गत महाविद्यालयाचे ४ विद्यार्थी व प्रशिक्षक डॉ. सय्यर जमीर

# ✲ महाविद्यालयीन उपक्रम ✲



स्नेह संमेलन उद्घाटन व मराठी दिन समारोह प्रसंगी उद्बोधन करताना डॉ बालाजी नागटिळक




ट्रॅडिशनल डे साजरा करताना विद्यार्थी



स्नेह संमेलन क्रिकेट स्पर्धा



स्नेह संमेलन विविध स्पर्धा



स्नेह संमेलन समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ मुस्तजीब खान, प्राचार्य डॉ नंदकुमार राठी, स्नेह संमेलन समन्वयक डॉ एस. देशमुख, नॅक समन्वयक प्रा गवळी, प्रा डॉ सय्यद जमीर यांचा सत्कार करताना



आंतरराष्ट्रीय अतिथी साँड्रिन एन्टॉनी यांनी महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

# ❋ महाविद्यालयीन उपक्रम ❋



**प. पू. श्री. तारकऋषीजी म. सा. व प. पू. डॉ. श्री. सुयोगऋषीजी म. सा. अमोलक परिवारास संबोधित ...**



**प पू डॉ. श्री. सुयोगऋषीजी म सा यांचे जैनाचार्य प पू श्री. अमोलकऋषीजी म सा यांच्या जीवनावर व्याख्यान**



प. पू. डॉ. श्री सुयोग ऋषीजी म सा व प. पू. डॉ. श्री तारक ऋषीजी म सा यांनी अमोलक देवराई दिलेली भेट प्रसंगी संस्थेचे मान्यवर पदाधिकारी, प्राचार्य डॉ नंदकुमार राठी, उपप्राचार्य डॉ जे. एम. भंडारी



महाराष्ट्र राज्य बास्केट बॉल टिममध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्रशिक्षक डॉ. सय्यद जमीर




जागतिक महिला दिनानिमित्त अतिथी डॉ पुनम मार्कंडे व संस्थेचे मान्यवर महिला पदाधिकारी



सौ. सुनीता ताई पोखरणा, महिला दिनानिमित्त आयोजित व्याख्यान

## ✻ विशेष उल्लेखनीय ✻



### प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख

रसायनशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
व शासकिय आयुष मंत्रालयाचे योगा टिचर



### प्रा डॉ शिवराज पाताळे

वनस्पतीशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद



### डॉ. मदन मार्कंडे

वाणिज्य अभ्यासमंडळ सदस्य
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद



### प्रा.डॉ. अशोक कोरडे

अर्थशास्त्र अभ्यासमंडळ सदस्य
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद



### प्रा.डॉ. सय्यद जमीर

शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळ सदस्य व
प्रशिक्षक महाराष्ट्र टिम
डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद



### प्रा.डॉ. एस.एम. जगदाळे

एस.पी. पुणे विद्यापीठ, पुणे तर्फे
डॉक्टरेट पदवी प्रदान

## ✻ विशेष उल्लेखनीय ✻



### अजय पवार

सुवर्ण पदक, क्रिडा महोत्सव औरंगाबाद व उदयपूर



### साहिल धनवटे

कर्णधार, महाराष्ट्र टिम सुवर्ण पदक औरंगाबाद, बंगलौर व इंदोर



### प्रेम मिश्रा

ग्वालियर बास्केट बॉल विद्यापीठ खेळाडू



### सय्यद आफताब

रौप्य पदक, सोलापूर व ग्वालियर बास्केट बॉल खेळाडू



### दिया जासूद

योगा, रोपमल्लखांब सुवर्ण पदक महाराष्ट्र ऑलिंपिक व विद्यापीठ खेळाडू



### स्वप्निल ढोबळे

सुवर्ण पदक, औरंगाबाद, ग्वालियर, उदयपूर बास्केट बॉल खेळाडू

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

# श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, श्री अमोलक विज्ञान व पनालाल हिराला गांधी वाणिज्य महाविद्यालय

कडा, ता. आष्टी, जि. बीड

## श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त व पदाधिकारी मंडळ

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. गोकुळदासजी आनंदरामजी मेहेर | विश्वस्त अध्यक्ष |
| २. | श्री. बाबुलालजी सुरजमलजी भंडारी | विश्वस्त उपाध्यक्ष |
| ३. | श्री. दिलीपकुमारजी चांदमलजी बाफना | विश्वस्त सदस्य |
| ४. | श्री. पोपटलालजी चांदमलजी भळगट | विश्वस्त सदस्य |
| ५. | श्री. दिलीपकुमारजी लालचंदजी पटवा | विश्वस्त सदस्य |
| १. | श्री. योगेशकुमारजी सुमतीलालजी भंडारी | अध्यक्ष |
| २. | श्री. कांतीलालजी फकीरचंदजी चानोदिया | कार्याध्यक्ष |
| ३. | श्री. अनिलकुमारजी पोपटलालजी झाडामुथ्था | उपाध्यक्ष |
| ४. | श्री. बिपीनकुमारजी प्रेमराजजी भंडारी | उपाध्यक्ष |
| ५. | श्री. हेमंतकुमारजी बाबुलालजी पोखरणा | प्रधानमंत्री |
| ६. | श्री. विनोदकुमारजी मनसुखलालजी बलदोटा | मानदमंत्री |
| ७. | डॉ. महेंद्रकुमारजी रसिकलालजी पटवा | मानदमंत्री |
| ८. | डॉ. उमेशकुमारजी अशोकलालजी गांधी | कोषाध्यक्ष |
| ९. | श्री. रमेशलाल हरकचंदजी गुगळे | कार्यकारी सदस्य |
| १०. | श्री. संजयकुमारजी कांतीलालजी मेहेर | कार्यकारी सदस्य |
| ११. | श्री. योगेशकुमारजी श्रीमलजी चाणोदिया | कार्यकारी सदस्य |
| १२ | श्री. संजयकुमारजी मनसुखलालजी कोठारी | कार्यकारी सदस्य |
| १३. | डॉ. प्रमोदकुमारजी प्रकाशलालजी भळगट | कार्यकारी सदस्य |
| १४. | श्री. प्रफुल्लकुमारजी मिठुलालजी पोखरणा | कार्यकारी सदस्य |
| १५. | श्री. संजयकुमारजी चंपालालजी भंडारी | कार्यकारी सदस्य |
| १६. | श्री. संतोषलालजी रुपचंदजी गांधी | कार्यकारी सदस्य |
| १७. | श्री. संतोषलालजी पोपटलालजी भंडारी | कार्यकारी सदस्य |
| १८. | श्री. अमोलकुमारजी विजयलालजी पटवा | कार्यकारी सदस्य |
| १९. | श्री. वसंतलालजी फुलचंदजी चोरबेले | कार्यकारी सदस्य |
| २०. | श्री. अनिललालजी रतनलालजी मेहेर | कार्यकारी सदस्य |
| २१. | श्री. अजयकुमारजी मिठूलालजी चोरबेले | कार्यकारी सदस्य |
| २२. | श्री. ललीतकुमारजी मदनलालजी कटारिया | कार्यकारी सदस्य |

# अनुक्रमणिका



| अ.नं. | लेख | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रमाता जिजाऊ आजच्या स्त्रीयांचे प्रेरणास्थान | ज्ञानेश्वर रागोळे | २१ |
| २. | सावित्रीबाई फुले | प्रतिक्षा पोकळे | २३ |
| ३. | आजच्या स्त्रीची प्रेरणा सावित्री | पुनम चेडे | २४ |
| ४. | आजादी की महोत्सव (कविता) | अनभुले प्रतिक्षा | २५ |
| ५. | भारत का अनमोल समय (कविता) | विशाल भुजबळ | २५ |
| ६. | अहिल्याबाई होळकर : एक कर्तबगार स्त्री | आदिती सोनावणे | २६ |
| ७. | मदर तेरेसा | सुनिल संजय शिंदे | २९ |
| ८. | मुलींना शिक्षण हवंच | पुजा नवले | ३१ |
| ९. | नात | गीता गव्हाणे | ३२ |
| १०. | नारी शक्ती तू | पुजा काळे | ३२ |
| ११. | भारतीय समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा | उर्मिला बबन काकडे | ३३ |
| १२. | महिला सबलीकरणाची वाटचाल | भोसले ऋतुजा | ३५ |
| १३. | स्त्री ही माणूस आहे | चव्हाण ऋतुजा | ३७ |
| १४. | आजची स्त्री सबलीकरण यशाचे गमक | यशोदा नितीन भळगट | ४० |
| १५. | भारतीय महिलांच्या चळवळी | अंजली बाळू अनारसे | ४२ |
| १६ | नवनिर्वाचित राष्ट्रपतींचे पहिले भाषण<br>''मो जीवन पढे नर्के पडी थाउ, जगत उद्धार हेउ''। | प्राचार्य डॉ. एन.एस. राठी | ४४ |
| १७ | ''महिला सन्मान योजना बस प्रवासात ५०% सूट'' | डॉ. सुपर्णा देशमुख | ४५ |
| १८ | Women Empowerment: Need of an Era | डॉ. एन.जी. कराले | ४६ |
| १९. | अर्थशास्त्र विभाग | डॉ अशोक कोरडे | ४९ |
| २०. | राज्यशास्त्र विभाग | प्रा.डॉ. गोंदकर टि.डी. | ५० |
| २१. | समाजशास्त्र विभाग | डॉ. शिवाजी भोसले | ५० |

## अनुक्रमणिका


| अ.नं. | लेख | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| २२. | हिंदी विभाग अहवाल | डॉ. विष्णू गव्हाणे | ५१ |
| २३. | क्रिडा विभाग अहवाल | क्रिडा विभाग प्रमुख | ५१ |
| २४. | लोकप्रशासन विभाग | डॉ. मगर एस.आर. | ५२ |
| २५ | वाणिज्य विभाग | डॉ. मार्कंडे एम.आर. | ५२ |
| २६. | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र सांकेतक क्रमांक २२१५५ | प्रा.डॉ. अशोक कोरडे | ५३ |
| २७. | मराठी विभाग | प्रा.डॉ. अनिल गर्जे | ५४ |
| २८. | DEPARTMENT OF CHEMISTRY | डॉ. एस.आर देशमुख | ५५ |
| २९. | DEPARTMENT OF PHYSICS | डॉ. जे.एम. भंडारी | ५६ |
| ३०. | DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE | श्री. एम.आर. हसे | ५७ |
| ३१. | DEPARTMENT OF COMPUTER APPLICATION | श्री. व्हि.टी. वाघुले | ५७ |
| ३२. | YOUTH FESTIVAL REPORT | श्री. व्हि.टी. वाघुले | ५८ |
| ३३. | DEPARTMENT OF GEOGRAPHY | डॉ. उद्धव चव्हाण | ५९ |
| ३४. | DEPARTMENT OF ZOOLOGY | डॉ. रमेश अबदार | ६० |
| ३५. | श्री अमोलक देवराईचा वर्षपूर्ती सोहळा | प्रा. एस.एस. पाताळे | ६१ |
| ३६. | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग | डॉ. अलिन गर्जे | ६२ |
| ३७. | DEPARTMENT OF MATHEMATICS | डॉ. अरुणा कुलकर्णी | ६४ |
| ३८. | राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०२२-२३ | डॉ. विष्णू गव्हाणे | ६५ |
| ३९. | Department of Botany | प्रा. युनूस सय्यद | ६६ |
| ४०. | DEPARTMENT OF ENGLISH | प्रा. एन.टी. गवळी | ६७ |
| ४१. | वार्षिक स्नेह संमेलन अहवाल २०२२-२३ | प्रा.डॉ. सुपर्णा देशमुख | ६८ |

# राष्ट्रमाता जिजाऊ आजच्या स्त्रीयांचे प्रेरणास्थान



''हो जन्म फिरुनी येईन मी हो पोटी खोटी
ठरो नदेवा ही एक भास मोठी''

या माधव जुलीयन यांच्या काव्यपंक्ती वाचतांना आपल्या आईविषयीचे भाव प्रकट होताना दिसतात. पण आजच्या पाश्चात्य संस्कृतीच्या विळख्यात अडकून पडलेला हा समाज आणि ह्यामध्ये असलेले माता व मुलांचे नाते हे फार प्रभावी दिसत नाही.

पण ह्या महाराष्ट्र भूमीला लाभलेला वारसा हा कधीही न विसरण्यासारखा आहे. तो म्हणजे राष्ट्रमाता जिजाऊ होय. मध्ययुगीन इतिहासाच्या पाने चाळली असता, आपणास कोणत्याही स्त्रीचे मोलांचे कार्य आढळणार नाही. पण ह्या महाराष्ट्रभूमीला घडविण्यासाठी जिल्हच्यापोटी स्वराज्याचा नंदादीप प्रज्वलीत झाला, तो ह्याच माऊलीचा पोटी होय.

लखूजी जाधव आणि उमाबाई यांच्या पोटी इ.स.१५९५ मध्ये जिजाऊ हे कन्यारत्न जन्माला आले. इ.स. १६१० मध्ये जिजाबाईचा विवाह तोलामोलाच्या भोसले घराण्यातील शहाजीराजाशी झाला जिजाऊ ह्या महान मातेच्या उदरातून शिवबाळ १९ फेब्रुवारी १६३० ला शिवनेरी किल्यावर स्वराज्याचा दिप प्रज्वलित झाला. अशा परिस्थितमध्ये प्रत्येक स्त्रीला आपल्या जवळच्या माणसांची आवश्यकता असते. पण त्या निजामशाहीच्या काळामध्ये शहाजीराजे हे कर्नाटकात होते. यामुळे शिवाजी राजाच्या संगोपनाची पुर्ण जवाबदारी जिजाऊ वर येवून पडली, जिजाबाईने शिवाजी राजाला रामाच्या, श्रीकृष्णाच्या, अभिमन्यूच्या कथा ऐकवल्या त्यांना समाजामधील सर्व गोष्टीचे ज्ञान करुन दिले. पित्याची आणि मातेची भूमिका त्या बजावत होत्या. कठोर, शिस्त, रुढी, प्रथा, परंपरा, मान, सन्मान, धर्म, यांचे काटेकोरपणे पालन करवून होत हे सारे जिजामाता शिवबाळास स्वत: करीत होत्या.

पण आजच्या ह्या २१ व्या शतकामध्ये मानव मानवास विसरत चालला आहे. कोठे प्रेम, कोठे जिव्हाळा, कोठे तिसिकवण, कोठे ते संस्कार आणि कोठे आजची आई.

स्वामी तिन्ही जगाची !
आई विना भिकारी...!

स्वामी विवेकानंदानी जे शब्द उदगारले ते आजच्या या युगामध्ये उलटे फिरताहेत. कारण आजच्या माते पासून कोणता आदर्श, कोणते संस्कार मुलांना व्हाव! आजच्या या युगात आई आपल्या जन्मदात्या मुलाला दुसऱ्याच्या स्वाधीन करुन ती नोकरीला, पार्ट्याला, जाते.ज्या वयामध्ये मुलाचे मनामध्ये काही रुजवायचे असते, घडवायचे असते पण ते आता सर्व कामे टि.व्ही. करत आहेत.

आई तुझ्या पुढे आहे अजून मी तान्हा ।
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा ।।

समाजातील किंवा कुटूंबातील एक पुरुष बिगडला तर काही फरक पडणार नाही. पण एक स्त्री बिघडली तर आखे कुटूंब डबघाईस येईल. शिवाजी, चंद्रशेखर भगतसिंह, राजगुरु, न होता. ती सलमान, सुनिल शेट्टी, इत्यादी रंगमंचकावर काम करणारे तयार होत आहे. याचे कारण स्त्रीच हेच आहे. आणि याला सर्वस्वी स्त्री ही जबाबदार आहे. असे विचार डोक्यात येताना आठवतो, तो जिजामातेचा प्रताप, आणि आपल्या मुलाला पाठीवरती घेवून लढणाऱ्या झाशीचीराणी लक्ष्मी बाईचा इतिहास, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, मदरतेरेसा, असा ह्या मातांचा आजच्या मातेने आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. नाहीतर पारतंत्र्यात वावरण्याची पाळी आपल्या देशावार आल्याशिवाय राहणार नाही. आणि ह्या सर्व घटनास कारणीभूत असणारी कोण असेल तर ती आजची माता आहे.

म्हणून आजच्या स्त्रीयानी जिजामातेचा आदर्श ठेवून शिवाजी घडवला पाहिजे, तरच हिंदवी स्त्री चे स्त्रीत्व कायम ठेवणारी अस्मिता टिकून राहील. राष्ट्रमाता जिजाऊ या केवळ शिवाजीच्या माता नव्हत्या तर हिंदवी स्वराज्य स्थापनेतील एक प्रेरक शक्ती होत्या. मराठवाड्यांच्या स्वातंत्र्याचा पाया त्यानीच घातला. न्यायी, धोरणी, मुत्सद्दी, महत्वाकांक्षी, आणि धीरगंभीर असल्यानेच त्यांची शिवाजी महाराजांच्या गैरहजेरीत म्हणजेच शिवाजी महाराज आग्रेच्या कैदेत असतांना स्वराज्याचा राज्यकारभार यशस्वीपणे सांभाळला, हे ऐतिहासिक सत्य कोण नाकारेल ? बाल शिवाजीच्या शुध्द चारित्र्याची जडणघडण घडविण्यात या माऊलीचा सिंहाचा वाटा होता. केवळ राजकारणाचेच डावपेच नव्हे तर रणांगणावरील प्रत्यक्ष युध्दात तलवार चालविणे. भालाफेक, घोडस्वारी आदीचे प्रशिक्षण दिले.

यावरुन घडणारी पिढी ही अशा प्रकारे घडताना दिसून येते. मुलगा शाळेतून किंवा क्लासेस हून येतो , आणि आई हा शब्द न उचारता तो मॉम हा शब्द उचारतो. कारण त्या मुलाला आई काय ? आहे, हे जाणवत नाही यामुळे आजच्या युगातील कोणत्या ही सिकंदराला, विवेकानंदाला, शिवाजीला, आई विना भिकारी होण्याची पाळी येणार नाही. कारण मातेने आपले सर्व अधिकार ह्या दासीच्या स्वाधीन केले आहेत. या प्रशिक्षणासाठी सक्षम, योग्य निष्णांत अशी गुरुची निवड केली गेली होती.

मावळ्यांत नवचैतन्य निर्माण केल्यानेच हिंदवी स्वराज्य स्थापनेत या सर्वांचे हातभार लागलेले आहेत. यवनाच्या दास्यत्वात लोळणाऱ्या समाजाला स्वातंत्र्याची जाणीव करुन देऊन त्यांच्यात हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न निर्माण करण्याचे श्रेय अर्थातच त्यांचेच आहे. माता म्हणून मुलाची काळजी, मुलगी म्हणून वडिलांची काळजी व पत्नी म्हणून पतीची काळजी घेणारी ती जिजाईच होती. सत्य, शास्वत, धर्म पालनाचे धडे देणारी, वात्सल्य व करुणाची सागर कर्तव्याचा प्रकाश दिव्य स्वरुपात वाटप करणारी ती होती राष्ट्रमाता जिजाऊच !



**ज्ञानेश्वर रागोळे**
(एस.वाय.बी.एस.सी.)



# सवित्रीबाई फुले

विद्येची आराध्य देवता, भारतीय स्त्री शिक्षणाच्या प्रणेच्या पहिल्या शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन कार्ये म्हणजे त्यांनी भारतीय समाजामध्ये घडवून आणलेली शैक्षणिक आणि सामाजिक क्रांती होय. त्यांची ही क्रांती दीपस्तंभाप्रमाणे आहे. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या प्रेरणेने मनुस्मृतीची चौकट तोडून सावित्रीबाईनी शिक्षण घेतले आणि महिलांना साक्षर करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. कारण त्यावेळेस सावित्रीबाईंनी स्वत: साक्षर होवून तिने मुलींना शिकविले. आणि आज प्रत्येक महिला साक्षर होवून गल्ली ते दिल्लीपर्यंत राज्य करीत आहेत. ज्यावेळेस त्या मुलीला शिकण्यासाठी जात होत्या. तेव्हा तिच्या अंगावर शेणाचे, मातीचे गोळे फेकून मारले जात होते. परंतु हे सर्व अन्याय-अत्याचार त्यांनी सहन केले. मागे जराही हटल्या नाहीत.

स्त्रियांना शिक्षण देणे हे कार्य पुढे सावित्रीबाईनी चाले ठेवले आणि स्त्रियांना एक मोलाचा संदेश दिला ''अक्षर कळेल संकट टळेल'' म्हणून त्यांनी सर्व मुलींना साक्षर करण्याचा निर्धार केला. आजच्या युगातील प्रत्येक शाळेतील, महाविद्यालयातील मुलींना सावित्रीबाई फुलेचे विचार आत्मासात करुन त्यांची पुजा केली पाहिजे. कारण एका घरातील एक स्त्री शिकली तर सर्व कुटूंब साक्षर होते. आपल्या मुला-मुलींच्या पहिला गुरु कोण असते, तर ती त्याची आई असते. ''ज्ञान हाच बुध्दी'' विकासाचा पाया आहे. विद्यार्जन करणे म्हणजे आपल्या बुध्दीचा विकास करणे, वाचणे, लिहिणे, निरीक्षण करणे आणि प्रत्यक्ष अनुभव घेणे. य मार्गांनी विद्या मिळविता येते. शिक्षण घेण्याची जिद्द प्रत्येक महिलांनी ठेवली पाहिजे

**प्रतिक्षा पोकळे**
(एस.वाय.बी.एस.सी.)

# आजच्या स्त्रीची प्रेरणा सावित्री

सावित्रीबाईंचा जन्म इ.स. १८३१ साली झाला. सावित्रीबाईंचा जन्म झाला तो काळ स्त्रियांचा दृष्टीने अत्यंत जाचक होता. त्या काळात स्त्रियांवर अन्याय-अत्याचार व्हायचे. 'चूल आणि मूल' एवढ्या पुरतेच मर्यादित होते. या अन्याय-अत्याचाराला तोंड देण्यासाठी सावित्रीबाईंचा जन्म झाला.

त्या काळात बालविवाह ही प्रथा रुढ झाली होती. वयाच्या नवव्या वर्षीच सावित्रीबाईंचे लग्न ज्योतिबा फुले यांच्या सोबत झाले. सावित्रीबाईंना ज्योतिबांचे सहकार्य लाभले. ज्योतिबांना १८४२ साली लिजिट साहेबांच्या सहानुभूतीने सरकारी शाळेत प्रवेश मिळाला.

शाळेत जावून इंग्रजी शिकू लागले. विद्यार्थी असतांनाच त्यांनी समाजसेवेचे प्रथम कार्य म्हणून आपल्या पत्नीस शिकविणे सुरु केले. त्या मिशन स्कूलमधून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्या. १७ व्या वर्षी त्यांनी शिक्षण कार्याला वाहून घेतले.

१४ जानेवरी १८४८ साली या दोघांनी पुणे येथे बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्याकाळात मुलींना कोणीही शाळेत पाठवित नसतं. कारण त्याच्यावर काही जाचक धार्मिक बंधने लादण्यात आली होती.

सावित्रीबाईंवर समाजातील लोकांनी शेण, विटांचा मारा केला. ते खाऊन आपले काम चालू ठेवावे लागले, कारण स्त्रीला शिक्षणापासून वचिंत ठेवले होते त्यांना घराबाहेर येवू देत नव्हते. समाजात त्यांनी शिक्षणाची दारे खुली केली. स्त्रियावर अनेक बंधने लादण्यात आली होती.

सावित्रीबाईंनी या स्त्रियां बंधनाला झुगारुन स्त्रियांना शिक्षणाच्या माध्यमातून योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते.

सावित्रीबाईंनी अत्याचारासह बळी पडलेल्या विधवा स्त्रियांकडून बालहत्या होवू नये, या हेतूने सावित्रीबाईंच्या देखरेखीखाली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना म. ज्योतिबा फुले यांनी २८ जानेवारी १८५३ रोजी केली.

या गृहात अनेक विधवा स्त्रिया बाळंत होवून गेल्या. या गृहात बाळंत होण्यास येणाऱ्या विधवांची व त्यांना होणाऱ्या अर्भकाची कसलीही सेवा करण्यास सावित्रीबाईंच्या मनाला कधीच कमीपणा वाटला नाही. एवढेच नाहीतर काशीबाई या एका विधवेच्या पोटी विवाहबाह्य संबंधापासून झालेल्या मुलास त्यांनी दत्तक म्हणून आपल्या ओटीत घेतले. आजही स्वयंसहाय्य गटातील ग्रामीण महिलांच्या सुप्तगुणांना वाव देण्याकरीता सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त महिलांचे विविध खेळांचे आयोजन करण्यात येते.

२०२३ यापूर्वी सुध्दा विविध तालुका व जिल्हा पातळीवर महिलांचे क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आले. यात अनेक महिला अत्यंत उत्साहाने कबड्डी, खो-खो तसेच १०० मीटर ते २०० मीटर धावण्याच्या, सहभागी झाल्या वर्षानुवर्षे सामाजिक नियम व रुढी परंपरेच्या दबावाखाली वावरत असलेली महिला स्वयंसहाय्य गटाच्या विविध उपक्रमाच्या माध्यामातून नेतृत्वशील होताना दिसत आहे.



अन्याय सोसून घरात राहून,
गुणाने नाही बसायचे
खांद्याला खांदा लावून आता,
सन्मानानं जगायचं,

ही खरी ओळख त्यांनी स्त्रियांना करुन दिली. अन्याय अत्याचाराला निर्भीडपणे उत्तर द्यायचे आपण पुरुषा बरोबर खांद्याला-खांदा लावून आता सन्मानाने जीवन जगायचे.

ग्रामीण किंवा शहरी भागात बचत गटामार्फत ती अनेक व्यवसाय करीत आहे. पापड बनविणे. दुकान चालविणे असे अनेक उद्योगधंदे बचत गटाच्या मार्फत महिला करतांना दिसत आहेत.

आजही महिला राजकारणात मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत. सिंधुताई सपकाळ या स्त्रीने आपले संपूर्ण जीवन दुसऱ्यासाठी वेचले मुला-मुलींसाठी अनाथ आश्रम काढले. अशाप्रकारे आजची स्त्री सबलीकरणाकडे वाटचाल करतांना दिसून येते. तिच्या मागे सावित्रीची प्रेरणा आहे.

**पुनम चेडे**
(एस.वाय.बी.एस.सी.)

# आजादी की महोत्सव

आझादी का महोत्सव यह
महोत्सव है देश के लिए
त्याग और बलिदान का ।
यह महोत्सव है, मातृभूमी के,
गौरव और स्वाभिमान का ।
भारत भूमी की स्वर्ग पताका,
आओ, हम सब मिलकर लहराएँ ।
शहीदों की पुष्प स्मृती मेंआओ,
हम सब मिलकर दीप जलाएँ ।
भारत के सब वासी हम मिलकर,
देशप्रेम की अलग जगाएँ,।
आओ, हम सब मिलकर, आज,
आझादी का अमृत महोत्सव मनाएँ ।

अनभुले प्रतीक्षा
द्वीतीय वर्ष बी. कॉम

# भारत का अनमोल समय

तुम उठो तिरंगा लहरा दो
भारत के भाग्य को फहरा दो
यही समय है, यही समय है
भारत का अनमोल समय है ।
कुछ ऐसा नही जो कर ना सकें
कुछ ऐसा नही जो पा न सकें ।
तुम उठ जाओ, तुम जुट जाओ
सामर्थ्य को अपने पहचानलो ।
अपने कर्तव्य को तुम सब जानो
आगे की ओर बढते जाओ ।
यही समय है यही समय है
भारत का अनमोल समय है ।

विशाल भुजबळ
तृतीय वर्ष, बी. कॉम

# अहिल्याबाई होळकर : एक कर्तबगार स्त्री



''स्त्री असावी कशी
आहिल्याबाई जशी''

त्याचप्रमाणे अनेक कर्तृत्ववान स्त्रियांचेही मुखदर्शन घडते. पुरातन काळापासून ते आजपर्यंत काही स्त्रियांनी त्या-त्या कालखंडावर आपल्या कर्तबगारीची मोहर उमटविलेली दिसते.

स्त्रियांनी मागे न राहता आपले पराक्रम त्या दाखवितांना दिसून येतात. मोठ्यातील मोठ्या संकटातही न डगमगता, धैर्य न सोडता, केवळ स्त्री म्हणून मागे न राहता अशा स्त्रियांनी इतिहासात आपले नाव अजरामर करुन ठेवले.

महाराष्ट्राचा विचार करावयाचा झाला, तरी अनेक स्त्रियांनी प्रतिकूल परिस्थितीतही संकटावर मात करुन आपले वेगळेपण सिध्द केले. मराठेशाहीच्या त्या कालखंडात पुरुषांप्रमाणेच काही स्त्रिया आपल्या पराक्रमाने चांदण्याप्रमाणे चमकले.

पूर्वीचा काळा हा पुरुषप्रधान संस्कृतीचा होता. सर्वत्र पुरुषांचा कारभार त्यांचीच जास्त चलती होती. तरीही काही स्त्रियांनी चिरस्मरणीय कामगिरी केलेली दिसून येते.

संधी मिळताच कर्तृत्वाच्या तेजाने तळपत अनेक स्त्रियांनी डोळे दीपतील, असे कार्य करुन दाखविलेले आहे. शिवछत्रपतींच्या मातोश्री राष्ट्रमाता जिजाऊ महाराजांच्या महाराणी ताराबाई आणि येसूबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई अशा स्त्रिया आपल्या कर्तृत्वाने मराठेशाहीच्या इतिहासात आपल्या परीने गाजल्या आहेत. पेशवाई संपतानाच्या काळात इंदूरच्या मल्हारराव होळकरांच्या सूनबाई पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर याही आपल्या कर्तबगारीने तळपल्या. चोख राज्यकारभार प्रसंगी हाती तलवार घेऊन लढण्याची तयारी, केलेला अपार दानधर्म, लोककल्याणाची कार्ये यामुळे त्यांचे नाव हिंदुस्थानात दुमदुमले.

अत्यंत प्रतिकूल काळातील त्यांनी होळकरशाहीचा राज्यकारभार जवळ-जवळ तीस वर्षे चोखपणे सांभाळून, प्रजेचे कल्याण साधले. त्यांनी देवतेप्रमाणे मानू लागले.

अनेक संकटांना झगडून, अपार दुःख त्यांच्या वाट्याला आले तरी अहिल्याबाईंनी धैर्य सोडले नाही. आपली कर्तव्यता त्या जाणून होत्या. म्हणून त्यांनी आपल्या कर्तव्यापासून कधी मागे फिरल्या नाहीत. त्यांच सात्विक तेजाने, प्रमाणिक राज्यकारभाराने भले-भले पुरुषही त्यांच्या वाटेला कधी जात नसत. जे त्यांच्या वाटेला गेले त्यांची फटफजिती झाली. राघोबादादा पेशवेही त्यांल्या कर्तृत्वाने दिपून गेले.

अहिल्याबाईंचे कर्तृत्व सर्वांनाच दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरलेले आहे. तर मुलांनो, आज आपण त्या महान स्त्रीबद्दल त्यांच्या कर्तृत्वाची, त्यांच्या धाडसीपणाची ओळख करुन घेऊ या.

अहिल्याबाईंचा जन्म

अहिल्याबाईंचा जन्मल्या तो काळ फारच धामधुमीचा होता. थोरले बाजीराव हे मराठेशाहीचे पेशवे या नात्याने कारभार पाहत होते. त्याचवेळी इ.स. १७२५ च्या सुमारास मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातल्या चौंडी या गावी अहिल्याबाईंचा जन्म झाला. आहिल्याबाईंच्या वडिलांचे नाव माणकोजी, तर आईचे नाव सुशिलाबाई होते. त्यांचे वडिल त्या गावचे पाटील होते. धनगर समाजातील ते एक कर्ते पुरुष होते. सात्विक वृत्तीचे धर्मपारायण गृहस्थ होते. घरातील वातावरण हे धार्मिक होते. आहिल्याबाईंना आणखी पाच भावंडे होते.

आहिल्याबाईंचे घराणे उत्तम स्वरुपाचे होते, सुखी होते. त्याकाळी स्त्रियांना शिक्षण घेता येत नसे. त्यामुळे अहिल्याबाई प्रत्यक्ष शाळेत गेल्या नाहीत. घराच्या सात्विक वातावरणामूळे त्या घरच्या-घरीच लिहायला-वाचायला शिकल्या .

घरातील वातावरण धार्मिक असल्याने पुराणे वाचली जात असतं. अहिल्याबाई सुद्धा या सर्वांचे वाचन करत असत. त्यामूळे आपोआपच ज्ञानसंपन्न आणि धार्मिक वृत्तीच्या होत गेल्या.

अहिल्याबाईच्या माता सुशीलाबाई या संसारदक्ष स्त्री होत्या. त्याही लिहायला-वाचयला शिकल्या होत्या. अहिल्याबाईंना त्यामुळेच घरच्या-घरी शाळेत न जाताही विद्याग्रहन करता आले. सात्विकता, धार्मिकता हे गुण अहिल्याबाईंनी आपल्या आईकडून उचलेले. अहिल्याबाईंनी मूळच्याच बुध्दिमान असल्याने चांगले-वाईट हे त्यांना चटकन ओळखता येऊ लागले होते. चांगल्या गोष्टीकडे त्यांचे मन लगेच वेधले जात असत. आई-वडिलांच्या त्या सुसंस्कारामुळे अहिल्याबाई लहानपणापासूनच सर्वगुणसंपन्न बनल्या व त्यांच्यामध्ये आपोआप सुशील व सात्विकपणा येत गेला.

अहिल्याबाईचा विवाह त्या आठ वर्षांच्या असतांनाच झाला. मल्हारराव होळकरांचे पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी झाला.

मल्हारराव होळकर हे कोणी साधी असामी नव्हती. थोरल्या बाजीराव पेशव्यांचे उजवे हात असलेले मल्हारराव मराठेशाहीतील पराक्रमी आणि नावाजलेले सरदार होते. अशा या तालेवार नावाजलेल्या घराण्यात अहिल्याबाई या मल्हारराव होळकरांच्या सूनबाई म्हणून दाखल झाल्या.

अहिल्याबाईंचे तेज प्रकट झाले :-

पुष्पाचा जसा सुगंध चरी बाजूंची मोहक रुपाने दरवळतो. तसाच या अहिल्याबाईच्या कार्याचा आणि राज्यकारभाराचा सुगंध सगळीकडे पसरला होता. अहिल्याबाई कोलमडून पडल्या नाहीत. प्रजेस आपली मानून त्या प्रजेच्या कल्याणासाठी झिजू लागल्या.

त्यांच्या कुशल कारभाराने त्यांनी प्रजेचे मन जिंकले. त्या तहानलेल्यांची तहान भागवू लागल्या. भूकेल्यांची भूक भागवू लागल्या ''राज्याचे धन म्हणजे प्रजेचीच ठेव'' ते त्यांच्या कल्याणसाठीच खर्च झाले पाहिजे, असे अहिल्याबाईचे विचार होते, जनतेच्या हितासाठीच पैसा अहिल्याबाई खर्च करु लागल्या. राजाला एक न्याय तर प्रजेला दुसरा, असे त्यांनी कधी केले नाही. सर्वांनाच त्यांनी समानतेने वागविले त्यांच्या राज्यकारभार न्यायाचा होता. त्यांना अन्याय सहन होत नसे, परोपकारामुळे सर्व हिंदुस्थानवर त्यांच्या चांगुलपणा डंका वाजू लागला होता.

एक स्त्री असूनही किती कुशलतेने राज्यकारभार करते, त्यांचे राज्य किती वैभवशाली आहे. याबद्दल अनेकांना कुतूहत होते. तरी काही लोभी माणसे राज्यावर डोळा ठेवूनच होती. अहिल्याबाई हे सर्व ओळखून होत्या. त्या कडक शिस्तीच्या होत्या. चुका करणाऱ्यांना त्या खडसावीत असत. तर त्यांच्या राज्यावर हल्ला करुन ही धन-दौलत लुटावी असे शेजारील अनेक राज्यकर्त्यांना वाटयचे.

त्या मोठ्या धैर्याच्या आणि धोरणी स्त्री होत्या. कोणी माझ्या राज्यावर चालून आल्यास मी जरासुध्दा डगमगणार नाही. मी हाती तलवार घेऊन उभी राहिले तर भल्या-भल्यांची अब्रू धुळीस मिळेल. इंदूरची जहागीर आम्ही काही हुजरेगिरी करुन मिळविली नाही तर तलवारीच्या पराक्रमवार त्यासाठी आम्ही रक्त सांडले आहे. आमच्या राज्याच्या रक्षणासाठी आम्ही आजही प्राणाची आहुती देऊ हे सर्वांनी लक्षात ठेवावे, असे अहिल्याबाईंचे सडेतोड विचार होते.

राज्यरक्षणाची सर्व तयारी त्यांनी केलेली होती अहिल्याबाई फार चाणाक्ष होत्या. राघोबादादा एकदा त्यांच्या राज्यावर केवळ खूप धन-दौलत मिळत या आशेने चालून जाण्याचे ठरविले. अहिल्याबाईंना ते समजतातच त्यांनी राघोबादादांना निरोप पाठविला. '' आपण एका स्त्रीबरोबर युध्द करु नका. नाहीतर तुमच्या तुमच्या नावास जो कलंक लागेल, तो कधी ही धुतला जाणार नाही. पण कदाचित तुमचा पराभव झाला तर सगळीकडे तुमचे हसू होईल''

यावर त्यांनी आपला बेत रद्द केला. ते केवळ अहिल्याबाईंच्या भेटीसाठी त्यांच्या दरबारात आले. अहिल्याबाई उदार मनाच्या होत्या त्या सर्व विसरुन त्यांनी राघोबादादांचा आदर करुन त्यांना नजराणा भेट दिला. अहल्याबाईंच्या औदार्याने राघोबादादांचे डोळे दिपून गेले.

अशाप्रकारे राज्यावर चालून आलेले मोठे संकट अहिल्याबाईनी प्रत्यक्ष युध्द न करताही दूर केले. त्यांनी शत्रूचे मन जिंकले. या घटनेने हिंदुस्थानावर त्यांचा नावलौकिक तर झालाच ; पण त्याच्याविषयी दरारा आणि जरबसुध्दा निर्माण झाला. आपल्या कर्तबगारीने कौतुकाचं, आदाराचे स्थान निर्माण केले. अशाप्रकारे अहिल्याबाईचे तेज प्रकट झाले.

त्या सर्वांच्या कौतुकाचा, आदराचा विषय ठरल्या. एक स्त्री असूनही पुरुषाला लाजवेल अशा कामगिरी त्या पार पाडीत होत्या. त्यामुळे सर्वत्र त्यांचा दरारा वाढला. एकादा अहिल्याबाईंच्या राज्यात बंड उद्‌भवले त्यात त्यांचे सेनापती गुंतले होते. अशावेळी स्वतः अहिल्याबाईंनी इकडून-तिकडून फौज गोळा करुन त्या बंड करणाऱ्यावंर चालून गेल्या. युध्दाला प्रारंभ झाला. अहिल्याबाई प्रत्यक्ष रणांगणावर हजर राहून सैन्याला मार्गदर्शन करीत होत्या. त्यात शत्रूचा पराभव झाला. अहिल्याबाईंच्या पराक्रमाने आणि बुध्दिमतेने सर्वजण आश्चर्यचकित झाले.

प्रजेला सुखी ठेवणे, हे माझे प्रथम कर्तव्य आहे. त्या सर्वांशी प्रेमाने वागत. मात्र शत्रुचा कडवा प्रतिकार करीत असत. त्यांचा राज्यकारभार प्रामाणिक होता. अहिल्याबाईंनी आपल्या आचरणातून प्रजेसमोर मोठा आदर्श ठेवला होता. प्रजेशी त्यांचा व्यवहार नेहमी माया-ममतेचाच रालिला. न्यायाचे राज्य हेच त्यांच्या राज्यकारभाराचे गमक होते. त्यांच्या दरबारात केव्हाही येऊन भेटण्याची मुभा होती. म्हणून लोक अहिल्याबाईंच्या राज्यात आनंदी होते. अहिल्याबाईंना राज्यकाराभाराबरोबरच इतरही चांगली माहिती होती. राज्यांच्या सीमांची बिनचूक माहिती त्यांना होती. तसेच कायदा व त्यांचे ज्ञानसुध्दा त्यांना होते. त्यांची स्मरणशक्ती अफाट होती. कायद्यावर बोट ठेवून कोणी प्रजेची छळवणूक करीत असेल, तर त्या माणसांची त्या तमा बाळगत नसत. सेवकांवर त्यांचा करडा अंमल होता. सरकारी कामकाजाची त्यांना माहिती आसल्यामुळे अधिकारीवर्ग नेहमीच दक्ष असे. अहिल्याबाई म्हणजे त्या काळातील एक उत्कृष्ट प्रशासक असाच त्यांचया नावलौकिक होता.

पण काही ठिकाणी आजही स्त्रीला दासीची वागणूक दिली जाते. तिला कमी लेखल्या जाते. पण हे प्रमाण थोडे आहे आणि काही दिवसांनी हे नष्ट होईल, याची ठाम खात्री आम्हास आहे. ही छोटीशी गोष्ट त्या स्त्रीची, तिच्याकडे पाहून बऱ्याच जणांनी जीवन जगण्याचे धडे घेतले आणि त्यातील मी एक ती स्त्री माझ्यासाठी खंरच एक आदर्श आहे. त्या स्त्रीला माझ्या आदरपूर्वक नमस्कार !

**आदिती सोनवणे**
(एस.वाय.बी.एस.सी.)

# मदर तेरेसा



मदर तेरेसा यांना जन्म २६ ऑगस्ट १९१० रोजी स्कपये येथे एका अेल्बेनियम कुटुबात झला आणि जन्मलेल्या दिवशीच ख्रिश्चन प्रथेनुसार त्याचे नामकरण अॅग्रेस गोन्खा असे करण्यात आले. ते कॅथॉलिक कुटूंब धर्मावर श्रध्दा ठेवणारे होते. तिची आई गरिबांना व गरजू लोकांना अन्न आणि पैसे देत असे, दुर्देवाने अॅग्रेस नऊ वर्षांची असतानाच तिचे वडील वारले तिच्या आईने संसारातून सर्व अंग काढून घेतले. सर्व भार स्वत: सावरला. दारिद्र्याशी निर्भयपणे सामना करणे, ही महत्वाची गोष्ट अॅग्रेस शिकली. दोन्ही बहिणी स्थानिक शाळेत गेल्या व चांगल्या रितीने शिक्षण घेतले अग्रेसला लेखनाची चांगली देणगी लाभलेली होती.

त्यांनी भरतात जाऊन धर्मउपदेशिका बनण्याचा निश्चय केला. त्यासाठी मठवासिनी होणे भाग होते, परंतु अग्रेसची गरिबांची सेवा करण्याची आईने दखल घेतली आणि तिला करता येईल तेवढी मदत केली. १९२८ साली डिसेंबरच्या एक तारखेला भारताच्या प्रवासास निघाल्या. पुढे चार महिन्यानंतर २३ मे १९२९ रोजी नऊ नवउपदेशित झाली आणि त्यांनी तेरेसा हे नाव धारण केले. अगदी सामान्यातील सामान्य काम त्या अगदी उत्सहाने करीत. दारिद्र्य, नैतिकता आणि आज्ञापालन यासाठी वाहून घ्यावयाचे ही पहिली शपथ त्यांनी घेतली. त्यांना हिमालयाच्या पायथ्याशी दार्जिलिंग येथे पाठविण्यात आले. त्यांना तेथे लोरेटो कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकवायचे होते. पण तेथील रुग्णालयात ही त्या मदत करत असत. तेथे अनेक रुग्ण येत असत. त्यांची भयानक अवस्था असायची. पाठीवर फोड आणि गाठी व्रणदेखील असत. त्या रुग्णालयात अतिशय आनंदाने त्या काम करीत असल.

दार्जिलिंगचा काळ संपल्यावर त्यांना कलकत्त्याला देखील पाठविण्यात आले. तेथे पूर्व भागातील एन्टाली या गलिच्छ वस्तीमधील लोरेटा सिस्टर्स कंपाऊडमध्ये राहू लागल्या. त्यांनी कंपाऊडच्या बाहेर सेंट टेरेसा शाळेत शिकविण्याचे काम त्यांनी चालू केले. शाळेत जाता-येता कलकत्त्यामधील भीषण दारिद्र्य आणि वंचित जीवन जवळून बघण्याची संधी त्यांना लाभली. नवउपदेशिता आणि नंतर मठवासिनी अशी एकोणीस वर्षे सिस्टरचे जीवन जगल्या.

बंगालमध्ये १९४३ साली महाभयानक दुष्काळ पडला. पन्नास लक्ष लोक मृत्युमुखी पडले. सर्वत्रच भुकेने व्याकूळ झालेल्या व्यक्तिचे थवे दिसत होते. सिस्टरने शाळेतील मुलांना काढून हाऊसमध्ये निर्वासिताची सोय कली. वातावरण सामान्य होईपर्यंत रोग्याची शुश्रूषाही करीत होत्या. पुन्हा त्या दर्जिलिंगला जाण्यास परतल्या तेव्हा त्यांना असा भास झाला की, ''परमेश्वर आपल्या हातनं काही विलक्षण घडवू पाहतो आहे.'' याची जाणीव त्यांना झाली तो दिवस होता १० सप्टेंबर १९४६ आणि पुन्हा त्या कलकत्त्याला परतल्या की, गरीब रोग्यांची सेवा करणे हेच आपले कर्तव्य होय, असे त्यांना वाटले. परमेश्वराने आपल्याला भेट दिली आहे. आणि आपण ती पाळली पाहिजे, असे सिस्टर टेरेसांना वाटू लागले. गोम्स कुटूंबीय आणि टेरेसा मित्र होते. एकेकाळी सिस्टर टेरेसाची विद्यार्थिनी होती. माध्यमिक शाळेच्या शेवटच्या वर्षाला होती. अत्यंत श्रीमंत कुटुंबातील होती, परंतु, मदर टेरेसाचे काम पाहून तिने आपले सर्व कामे सोडून ती तेरेसांसोबत काम करु लागली. काही आठवड्यानंतर एक विद्यार्थिनी आली.

त्यानंतर सिस्टर डॉरथी नावाची तरुण सहकारिणी आली. सिस्टरने शाळेतील मुलांना काढून हाऊसमध्ये निर्वासिताची सोय कली. वातावरण सामान्य होईपर्यंत रोग्याची शुश्रूषाही करीत होत्या. पुन्हा त्या दर्जिलिंगला जाण्यास परतल्या तेव्हा त्यांना असा भास झाला की, ''परमेश्वर आपल्या हातनं काही विलक्षण घडवून पाहतो आहे.'' याची जाणीव त्यांना झाली तो दिवस होता १० सप्टेंबर १९४६ आणि पुन्हा त्या कलकत्याला परतल्या की, गरीब रोग्यांची सेवा करणे हेच आपले कर्तव्य होय, असे त्यांना वाटले. परमेश्वराने आपल्याला भेट दिली आहे. आणि आपण ती पाळली पाहिजे, असे सिस्टर टेरेसांना वाटू लागले. गोम्स कुटूंबीय आणि टेरेसा मित्र होते. एकेकाळी सिस्टर टेरेसाची विद्यार्थिनी होती. माध्यमिक शाळेच्या शेवटच्या वर्षाचा होती. अत्यंत श्रीमंत कुटुंबातील होती, परंतु, मदर टेरेसाचे काम पाहून तिने आपले सर्व सोडून ती तेरेसोबत काम करु लागली. काही आठवड्यानंतर एक विद्यार्थिनी आली. त्यानंतर सिस्टर डॉरथी नावाची तिसरी तरुण सहकारिणी आली. एका बाजूला दुःखाने भरलेले अक्राळविक्राळ भीतीदायक शहर पांढऱ्या साड्या परिधान केलेल्या या मुली वस्तीमध्ये जाऊन लहान मुलांची त्या देखभाल करत असत. सिस्टर टेरेसा प्रत्येक कामामध्ये सहभागी होत. अगदी संडास धुण्यात सारख्या स्वच्छतेच्या काम देखील करत. सिस्टर तेरेसाने भारतीय नागरिकत्व स्वीकारले आता त्या खरोखरच असंख्य गरिबांपैकी एक झाल्या होत्या.

सुरवातीच्या काळात इतरांची भूक भागावी म्हणून मदर स्वतः उपाशी राहत आणि त्यांना अन्न देत असत. रस्त्यावर टाकून दिलेली अर्भके शिशुभवनात आणली जात. त्यांना न्हाऊ-पिऊ घालत, जेवण भरवीत व जखमांवर मलमही करत. त्या काळी कलकत्त्यात सत्तर ते ऐंशी लाख लोक राहत. त्यापैकी एक लाख लोकांचे रस्ता हेच घर होते.

येथील कित्येक रोग्यांना प्रेम व दयाळूपणा म्हणजे काय असतो हे कधी माहितच नव्हते. त्यांना ते मदर कडून मिळाले. मदरची मालमत्ता म्हणजे त्यांच्या कडे तीन साड्या असत.

त्यांची नवी मोहिम मिशनरीज ऑफ चॅरिटी ज्या उपाशी मरणोन्मुख, बेसहारा मुलांना मदत करीत होते. त्यांच्यापेक्षाही दुःखी कष्टी होते. कुष्टरोग या रोगाने स्त्री-पुरुषांना बहिस्कृतातील बहिस्कृत केले होत. परंतु पहिल्या फिरत्या अनुभवावरुन रुग्णालयाच्या कुष्टरोग्यानांही मदत करणे सुरु केले. मदर तेरेसांनी जबाबदारी स्वीकारली आणि कुष्ठरोग निर्मूलन केंद्र बंद करुन शहरा बाहेर एका नवीन सुसज्ज रुग्णालयाची स्थापना केली.

११ डिसेंबर १९७९ रोजी जगातील सर्वोच्च नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. तो पुरस्कार घेतांना म्हणाल्या की, मी हा पुरस्कार मिळाला म्हणून आनंदी होत नाही. तर लोकांना जाणीव व्हावी यासाठी पुरस्कार स्वीकारत आहे. व्यक्तिशः या पुरस्काराला मी पात्र नाही, असे त्या म्हणाल्या आणि त्या संपूर्ण जगाच्या मदर म्हणजे आई झाल्या.

**सुनिल संजय शिंदे**
(एफ.वाय.बी.एस.सी.)

# मुलींना शिक्षण हवंच




स्त्री समानतेची मूल्ये ही महाराष्ट्राची पंरपरा आहे. पुरोगामी महाराष्ट्राचे स्त्री शिक्षणाचा पाया या देशात घातला, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे यांसारख्या समाजसुधारकांच्या अथक श्रमाचे फलीत म्हणूनच आज या देशात स्त्री सर्वत्र अग्रेसर दिसत आहेत ती आणखी अग्रेसर व्हावी, म्हणून शिक्षण विभागातर्फे मुलींसाठी विविध योजना राबविल्या जातात. विकासाचा पाया शिक्षण हाच असल्याने महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकिकरणावर विशेष भर देण्यात येत आहे. भारतीय राज्यघटेनेच्या ३६ व्या घटना दुरुस्तीअन्वये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले असून राज्यघटनेच्या कलम २१ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. त्यादृष्टीने राज्यात शाळाबाह्य मुला-मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यावर भर देण्यात येत आहे. विशेषत: एक मुलगी शिकली की एक कुटूंब शिक्षित होते आणि ही शिक्षित मुलगी आपली मुले शिकावीत म्हणून प्रयत्नशील राहते.

महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षण कार्यात स्वत:ला झोकून देऊन या कामात अग्रणी राहिलेल्या सावित्रीबाईच्या नावाने सुरु करण्यात आली. एक मुलगी शिकली म्हणजे एक पिढी साक्षर होते, ही बाब लक्षात घेऊन मुलींच्या शिक्षणावर राज्य शासन भरत देत असून सर्वशिक्षा अभियांनार्तगत राज्यात ज्या ठिकाणी महिला आणि पुरुष साक्षरतेमध्ये २१.६९ टक्के फरक असेल असे विकास गट निवडून त्या ठिकाणी हा कार्यक्रम राबविला जातो.

मीना मंच उपक्रमामुळे शाळेतील मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रमाणात घट व्हावी, यासाठी सर्वशिक्षा अभियानांतर्गत मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे प्रयत्न सुरु असून, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या अशा मुलींसाठी नवोपक्रम मुलींचे शिक्षण या योजनेअंगर्तत ''मीना'' हा उपक्रम महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेततर्फे राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हात एकूण ८८ हजार ९९० मीना मंच स्थापन करण्यात आले आहेत. मीना हे किशोरवयीन मुलीचे प्रतीक आहे. अल्लड, निरागस अशा या पात्राची संकल्पना मुलींच्या कुटुंबीयांशी जवळीक साधण्यासाठी तयार करण्यात आली आहे. शहर किंवा ग्रामीण भागता अजूनही मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. मुलींना शाळेत जावू देत नाहीत तर त्या घरातील धाकटी भावंडे सांभाळणे, घर किंवा

शेतीकामात मदत म्हणून अशा किशोरवयीन मुलींना शाळेतून बाहेर काढून टाकले जाते यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. या मीना मंचद्वारे अशा शाळेतून बाहेर पडलेल्या मुलींना पुन्हा शाळेत पाठविण्यासाठी आई-वडिलांचे मन वळविले जाते. मुलींना प्रोत्साहन देवून त्यांची समजूतही काढली जाते, नात आणि आजी यांचे मेळावे, शिक्षणासंबंधी जागरुकता निर्माण करुन आरोग्य व स्वच्छता यासंबंधी मार्गदर्शक करण्यात येते, थोडक्यात, या मुलींमध्ये नेतृत्व आणि सहकार्यांची भावना निर्माण केली जाते.

राज्यातील सर्व जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून प्राथमिक शाळेतील मुलींचे गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी इयत्ता १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील दारिद्र्य रेषेखालील सर्व मुली व आदिवासी उपाययोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती/जमातीच्या दारिद्र्य रेषेखालील मुलींना शाळेत नियमित उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन प्रत्येक मुलींमागे एक रुपया या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता दिला जातो मुलगा व मुलगी असा भेद कुठेही होता कामा नाही, ह्यासाठी शासनातर्फे मुलींच्या शिक्षणापासून त्यांच्या विविध सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न कला जातो.

समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळाले तरच खऱ्या अर्थाने विकास हावू शकतो. सामाजिक न्याय साधायचा असेल तर मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणावर प्रधान्याने लक्ष द्यायला हवे.

त्या उद्देशाने मागासवर्गीय मुलींना विविध योजनांच्या माध्यमातून शिक्षणाच्या सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. शिक्षण हे स्त्री सबलीकरणाचे साधन मानून त्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे दिसून येते.

**पूजा नवले**

(एफ.वाय.बी.कॉम.)

# नात

एक नातं जन्माचं
ते फक्त असते आईचं
वात्सल्येचं अस्तित्व असतं
येथे स्वार्थाला स्थान नसतं
एक नातं रक्ताचं
जे असतं भाऊ बहीणीचं
ज्यात राज्य असतं फक्त मायेचं
एक नातं आपुलकीच्या कर्माचं
ज्यात असते कसोटी व निष्ठा
इथे कामी येते धैर्य आणि वीरता
एक नातं मैत्रीचं
महत्त्व आहे यात वेळेचं
गरजेला मदत करण्याचं
आधाराचं एक नातं
नाव काही नसलेलं
तरीही मनात वसलेलं
दोन मनं जुळलेलं

गीता गव्हाणे
प्रथम वर्ष बी. ए

# नारी शक्ती तू

तुझ्या उत्तुंग भरारी पुढे
गगनही ठेंगणे भासावे
तुझ्या विशाल पंखाखाली
विश्व ते सारे वसावे ।।
कर्तव्य अन सामर्थ्याची
ओढून घे नवी झालर
स्त्री शक्ती चा होऊ दे
पुन्हा एकदा नवा जागर ।।
विधात्याची नवनिर्मिती ची
कलाकृती तु
एक दिवस स्वतः च्या अस्तित्वाचा
साजरा कर तु... ।।

काळे पुजा
टी.वाय.बी.ए.

# भारतीय समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा

भारतीय संस्कृतीत म्हटल्याप्रमाणे, स्त्री आणि पुरुष म्हणजे संसाराच्या गाडीची दोन चाके आहेत. ज्याप्रमाणे गाडी सुरळीत चालण्यासाठी दोन्ही चाकांची समान आवश्यकता असते. त्याचप्रमाणे या संसारिक गाडीला या सामाजिक जीवनात येणाऱ्या सर्व सुख-दुःखांना सामोरे जावून सुरळीतपणे चालावे लागते. पण प्रत्यक्षात आपणास असे कधीचं पाहण्यास मिळत नाही की, स्त्री आणि पुरुष हे एकमेकांना समान मानून समाजात वावरतात.

प्रत्येक पुरुष स्वतःला श्रेष्ठ मानतो आणि कोणतेही काम आपल्यापासूनच सुरवात व्हावे, ते काम आपल्या मनाप्रमाणे करण्सासाठी आपल्याला पूर्ण स्वातंत्र्य असावे, असे त्यांना वाटते, तो स्वार्थी वृत्तीने फक्त स्वतःच सुखाच व स्वातंत्र्याचा विचार करतो. पण आपली माता, बहिण, पत्नी आणि मुलगी या नात्याने असलेल्या स्त्रीचा मुळात विचारच करत नाही. पूर्वी काही वर्षापूर्वी स्त्री म्हणजे ''चूल आणि मूल'' सांभाळण्याची एक चालतीफिरती वस्तू मानली जात होती आणि तिला आपल्या कुटूंबातील पुरुष मंडळीप्रमाणे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. तसेचं फक्त तिच्याकडून काम करवून घेत असतं. ती पिंजऱ्यात बंद केलेल्या मैनेसारखी असते. मनात खूप काही करण्याची इच्छा असूनही घराच्या उंबरठ्याला ओलांडून कधी बाहेर पडण्याचा विचारही करीत नाही.

परंतु जेव्हा स्त्रियांच्या मानसिकतेचा विचार म.फुले, सावित्रीबाई फुले अशा अनेक थोर व्यक्तींनी केला आणि स्त्री शिक्षणाची एक पध्दत समाजात रुढ केली. कदाचित यामुळे तरी स्त्रिया शिक्षण घेवून स्वतःचा विकास करुन घेत आहेत. त्यांनी आपली बौध्दिक क्षमता वाढवून पुरुषांच्या बरोबरीने उभे राहण्यासाठी जी शपथ घेतली आहे. ती आज आपल्याला दूरदर्शन, वर्तमानपत्र तसेच विविध



प्रसारमाध्यमांच्या मार्फत दिसूत येत आहे. आज स्त्री अनेक क्षेत्रात पोलिस, शिक्षिका, वकील, शास्त्रज्ञ, लेखिका, डॉक्टर अशा पदव्या प्राप्त करुन स्वतःच्या कुटुंबचा उदरनिर्वाह करतांना आपणास दिसते.

हे सर्व ती समाजात आपलेही नाव पुरुषांच्या बरोबरीने सर्वांनी घ्यावे, येणाऱ्या अनेक स्त्रियांना त्यांच्यासमोर आदर्श म्हणून उभे राहण्याचे ती काम करते. एक स्त्री ही दुसऱ्या स्त्रीला तिच्या हक्क व कर्तव्याची देणगी प्राप्त करुन देण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. या कार्यासाठी आपणास इंदिरा गांधी, मदर तेरेसा, रमाबाई, सावित्रीबाई फुले, किरण बेदी आणि अशा कितीतरी स्त्रीयांची नावे घेता येतील ज्यांनी आपले पूर्ण जीवन स्त्रियांसाठी समर्पण कले आहे. या सर्व गोष्टी कितीही योग्य आणि सत्य असल्या तरी, आज २१ व्या शतकात देखील पुरुषांचा दृष्टिकोन बदललेला दिसत नाही.

स्त्रीला जगातील सर्व कनिष्ठ दर्जाच्या कामापासून पुढे जावे लागते. जेव्हा कुटुंबात मुलीचा जन्म होतो तेव्हा सर्व व्यक्तीच्या चेहऱ्यावर तो आनंद आपणास जाणवत नाही, जेव्हा मुलगा जन्माला येतो लहानपणापासून मुलीला आपल्या भावासोबत होणाऱ्या सर्व प्रेमांचा त्याच्या सुखाचा दुजाभाव सहन कराव लागतो. तरीदेखील ती गप्प असते. जेव्हा ती शाळेत जाण्याच्या योग्य होते. तेव्हा सुरुवातीला मुलांच्या मर्जीच्या विरुध्द त्याला जबरदस्तीने शाळेत पाठविले जाते. पण इकडे मुलीची ''इच्छा असली तरी ही तिला म्हटल्या जाते की, तू घरची कामे शिक म्हणजे लग्न झाल्यावर सर्व काही सोप होईल !'' अशी शिकवण तिला दिली जाते आणि एकदा की ती उपवर झाली म्हणजे सर्वांना एकदा तिचे हात पिवळे करण्याची काळजी रात्रंदिवस भेडसावत असते. लग्न म्हणजे तिच्या जीवनाचा प्रश्न असतो तरीदेखील त्या बाबतचा विचार तिच्याकडून घेतल्या जात नाही. मग ती आवड-निवड तर बाजूलाचं. !

लग्नानंतरही ती ज्या सुखांचे स्वप्न पाहते. ते तर मिळतच नाही, पण नको ते अत्याचार मग हुंड्यासाठी केलेले असो वा वंश चालविण्यासाठी मुलगा न होत असल्यामुळे केलेले असो. या दोन कारणांमुळे तर कित्येक स्त्रियां या सासरच्या छळाला त्रासून आणि माहेरच्यांची गरीब परिस्थिती असल्यामुळे त्यांच्या अपेक्षा पूर्ण न करता आल्यामुळे स्वत:ला संपवून टाकतात किंवा संपवण्याचा प्रयत्न करतात. या घटना बऱ्याचं प्रमाणात घडतात. याचे दुर्देवी चित्र वर्तमानपत्रात वाचून आपल्या अंगावर शहारे उमटतात. या गोष्टी वाचून-पाहून काहीतरी करण्याची प्रेरणा मनात जागवते. पण सरकारने स्त्री-मुक्ती, हुंडाविरोधी कायदा असे अनेक कायदे निर्माण केले. कित्येक चळवळी करण्यात आल्या पण त्या देखील काहीही करु शकल्या नाहीत. असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, पैशामुळे सर्वांची तोंडे बंद करण्यात आलेली आहेत. आज पुरुषात माणुसकी किंचितही शिल्लक राहिली नाही. एवढेचं नाही तर मुलींचा जन्माला येण्याच अगोदरच तिला मारुन टाकण्यात येत आहे. याच अर्थ असा की, स्त्री म्हणजे एक कलंक आहे, असाच विचार पुरुषांच्या आणि समाजात बिंबलेला असतो.

या समाजातील लोकांना हे सांगणे फार गरजेचे वाटते की, कारण आज होणाऱ्या मुलीच्या गर्भातील हत्या थांबवायच्या असतील तर पुरुषाने स्त्रियासंबधी हा विचार मांडला असता, जर स्त्री नसली तर स्त्रीच्या पासून मिळणारे अपत्य लग्नासाठी मुलगी (वधू) मिळाली नसती, भावाला बहिण मिळाली नसती, अनेक नात्यांच्या माळेत स्त्री गुंफलेली आहे. तर त्या माळेतून हे सुंदर फूल नसते तर त्या माळेला अर्थच उरणार नाही. स्त्रियांशिवाय जग किंवा पुरुष अशी आपण कल्पनाच करु शकत नाही. मी ही एक स्त्रीचं असल्यामुळे स्त्रियांबाबतचे विचार, माझ्या भावना येथे व्यक्त करते.



**उर्मिला बबन काकडे**
(एफ.वाय.बी.एस.सी.)

# महिला सबलीकरणाची वाटचाल

सक्षमीकरण म्हणजे नियंत्रण व संपादन करण्याची प्रक्रिया आहे. सबलीकरणातून महिलांना स्वत:वर नियंत्रण, विचारधारेवर नियंत्रण, साधन समाग्रीवरील नियंत्रण, शरीरिक, मानसिक, आर्थिक, राजकीय कौटुंबिक पातळीवर अधिकार व नियंत्रण मिळविणे म्हणजे सक्षमीकरण होय. सत्तेत पुरुषाच्या बरोबरीने वाटा मिळणे, संधीची समानता कोणत्याही भेदभावाशिवाय प्राप्त करुन विकास साधणे सबलीकरण किंवा सक्षमीकरण. म्हणजे महिलांच्या विकासाच्या संदर्भात ही संकल्पना रुढ झाली आहे. ही संकल्पना पावलो फ्रोरो यांनी पहिल्यांदा उपयोगात आणली आहे. अबला महिलांना सबला बनविणे आणि समान हक्क व संधी देणे हेच सबलीकरणाचे ध्येय आहे.

मानवी समाजव्यवस्थेच्या पूर्वीच्या काळी पाहिले असता असे दिसून येते की, आर्थिक विचारात, विज्ञान, तंत्रज्ञानात बदल झाला की, समाजव्यस्थेमध्ये बदल होतो. धर्म संस्था, कुटूंबसंस्था आणि एकूणच समाजाच्या आचार-विचारांत बदल होत असतो. यातूनच नवनिर्मित समाज निर्माण होतो. अशा समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान कसे असेल ? पारंपारिक मनोधारणेमध्ये स्त्री जीवनाचा आकार नव्या व्यवस्थेत कसा असेल ? परिवर्तनाचे चक्र त्यांना आवडेल का ? याचा विचार भारतीय समाजव्यवस्थेत आजचय स्त्रियांचा अभ्यास करताना करावा लागतो.

पूर्वीच्या काळी समाजव्यवस्थेने स्त्रियांना अत्यंत कनिष्ठ स्थान दिले आहे. त्यामुळे स्त्रिया सामाजिक व्यवस्थेत दुर्लक्षित राहिल्या आहेत. स्त्रियांना शारीरिक, मानसिक सतत छळास तोंड द्यावे लागले आहे.



महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने विचार करतांना पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना कायदेशीर, राजकीय, मानसिक, सामाजिक, आर्थिक व इतर सर्व हक्क पुरुषाबरोबर असावे लागतात. भारतात स्त्रियाच्या सक्षमीकरणाचा उद्देश स्त्रियांना सामाजिक व आर्थिक दृष्टिने सक्षम बनविणे हा आहे.

हिदू धर्मात स्त्रियांना ज्ञान शक्ती आणि संपत्तीचे प्रतीक मानले जाते. त्यातूनच स्त्रियांना सरस्वती, दुर्गा आणि लक्ष्मीचे रुप दिलेले आहेत.

स्त्री ही पुरुषाची अर्धांगिनी आहे. स्त्रीही कुटुंबाचे नाव आहे. ज्या राष्ट्रामध्ये स्त्रियांचा सन्मान केला जातो ते राष्ट्र आदर्श असते. वैदिक कालखंडामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क होते. स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा श्रेष्ठ होता. वेदामध्ये असे म्हटले आहे की, महिला हीच घर आहे. नववधू तू ज्या घरामध्ये तुझे पाऊले पडतील त्या घरची ती लक्ष्मी असते.

१६ व्या शतकापासून ते १८ व्या शतकापर्यंत कालखंड हा मध्ययुगीन कालखंड समजला जातो. या कालखंडामध्ये मुस्लिमाचे आक्रमण झाले व त्यानंतर स्त्रियावर वेगवेगळ्या प्रकारच्या अन्यायाला सुरुवात झाली.

महिला शिक्षणापासून वंचित असल्यामुळे बालविवाह प्रथा त्या काळामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये रुढ होती. सतीची प्रथादेखील समाजात अस्तित्वात होती. पतीच्या मृत्युनंतर पत्नीने सती जाणे, विधवा विवाह बंदी यासारखे महिलांवर कठोर असे नियम लागू झाले. समाजिक अज्ञानामुळे अंधश्रध्दा, कर्मकांडला भारतीय संस्कृतीचा मूलाधारही बनविली गेली.

इ.स. १८१३ मध्ये स्त्रियांना पुरुषांबरोबर शिक्षण घेण्याची परवानगी मिळाली. भारतीय समाजसुधारकांनी स्त्रियांना शिक्षण देण्याचा दृष्टिने प्रयत्न केले. १८२८ मध्ये राजाराम मोहनरॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना करुन सतीप्रथा विरोधामध्ये आंदोलन केले. यातूनच संपत्तीत स्त्रियांच हक्क, बालविवाहास विरोध पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण यासारखे महत्वपूर्ण कार्य केले. दयानंद सरस्वतीने जात प्रथा, बालविवाह, हुंडापद्धती-नाकारुन शिक्षणप्रसार केला व समाजाला जागृत केले. तसेच महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले या दोघांनी मिळून स्त्रीला संघटित करण्याचा विडा उचलला होता. त्यांनी स्त्रीसाठी पहिली मुलींची शाळा इ.स.१८४८ मध्ये काढली. येथूनच स्त्रियांना शिक्षणाचे दार खुले करुन दिले व स्त्रिया या शिकण्यासाठी प्रवृत्त झाल्या.

१९७५ ते १९८० पंचवार्षिक योजनेमध्ये महिला संबंधीत बदलाची प्रक्रिया ही गतिमान झाली. कारण प्रथमच विकास प्रक्रियेस चालना देण्याचा क्षमता स्त्रीवर्गामध्ये आहे. यावर भर देण्यात आला. तसेच स्त्रियांची प्रतिमा व त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याच्या गरजेकडे लक्ष वेधण्यात आले.

विकसनशील दृष्टिकोनावर आधारीत अशी ही संकल्पना मांडली असली तरी सुध्दा आजतागायत स्त्रियांच्या वेगळ्या, परंतु तितक्याच न्यायविषयीच्या दृष्टीने शासकीय यंत्रणा व दृष्टीकोन यात बदल घडून आणण्याचे कार्य हे मात्र दुर्लक्षित राहिले. पुरुषांचे क्षेत्र हे सार्वजनिक तर स्त्रियांचे मुख्य क्षेत्र म्हणजे पारंपारिक विचारसरणीचा पगडा हा शासकीय विचारसरणीत अद्यापही आहे.

विकासाच्या बरोबरीने सहभागाची संकल्पना आणि स्थानिक संस्था आणि त्यायोग्य स्त्रियांच्या हाती सत्ता सोपविण्याच्या दृष्टिने पंचायतराज सुधारणा हे महत्वाचे पाऊल होते. महाराष्ट्राने पंयाचतराज सुधारणा सर्वप्रथम अमंलात आणली व जिल्हा परिषदामध्ये महिला व बालविकासासाठी स्थानिक समित्या निर्माण करुन महाराष्ट्राचे आणखी एक पाऊल पुढे टाकले. १९९३ मध्ये महिला व बालविकासासाठी स्वतंत्र विभागाची स्थापना केली.

महाराष्ट्र राज्यातील स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुंतागुंत सुधारणेत हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या ६० वर्षानंतरसुद्धा भारत देशाच्या स्त्रियांच्या विकास होऊ शकला नाही. ही दुर्दैवाने मान्य करावे लागते. शासनाने महिला विरोधी अत्याचाराचे निर्मुलन करण्यासाठी कायद्याच्या आधाराने विविध सुधारणा करुन दिली. दोन्ही स्तरावर कायेदशीर समान बदलाची स्थापना करणाऱ्या प्रसारमाध्यमांचा व्यवस्थित वापर शासनाच्या कामकाजात सामाजिक सहभाग वाढविणे अशा स्त्रियांना शासनाच्या सोयीमध्ये दार हे उघडे करुन दिले.

आजच्या औद्योगिकीकरण, दळणवळण यामुळे शहरीकरण वाढत आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे आणि नव्या संकल्पनेची जाणीव ही समाजामध्ये रुढ झाली व यामध्ये महिलांना सावित्रीबाईने जो विडा उचलला होता, तो पुढे महिलांच्या सहाय्याने तो मात्र समाजामध्ये रुढ झाला व पुढे पुरुषांबरोबर महिला या वावरु लागल्या आणि पुरुषांच्या बरोबरीने महिलांन ३३ टक्के आरक्षण लागू झाले. या आरक्षणात मोलाचा वाटा हा सावित्रीबाईंचा आहे. म्हणून त्या म्हणतही ''जोपर्यंत स्त्री शिकणार नाही तोपर्यंत समाजाची प्रगती होणे शक्य नाही'' स्त्री सक्षमीकरणासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे.

**भोसले ऋतुजा**

(एफ.वाय.बी.एस.सी.)

# स्त्री ही माणूस आहे



स्त्री ही माणुस आहे ही कल्पना भारतात अजून रुजली नाही, वेद ''उपनिषद'' इत्यादी पूर्वीच्या काळापासून तिला देवी मानण्यात आले आहे. परंतु जसजसा काळा बदलत गेला तसाच स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत गेला. आजच्या काळात तर तिला एक उपभोगाची वस्तू म्हणून वापरण्यात येत आहे. एकदा स्त्रीला पुरुषाने देवता मानल्यानंतर साहजिकपणे देवतेच्या अंगी असणाऱ्या गुणांची तिच्याकडून अपेक्षा केली गेली. प्रेम, त्याग, समर्पण हेच तिचे सर्वस्व ठरते. एखादी स्त्री जेव्हा सामान्य माणसाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करते, तेव्हा तिला या आदर्श गुणांची आठवण करुन दिली जाते. तिच्या अचारविचारात किचितसा बदल झाला तर तिच्यावर दोषारोपण केले जाते. याचे स्पष्टीकरण रामायणातील व महाभारतातील स्त्रियांकडून आपल्याला मिळते. ही झाली प्राचीन काळाची कथा पण आजची गोष्ट त्यापेक्षा काही वेगळी नाही. स्त्रीची विटंबना आजही केली जाते ज्याप्रमाणे गाई-म्हशींचा बाजार असतो त्याप्रमाणे भारतात काही ठिकाणी स्त्रियांचे सुद्धा बाजार भरविले जातात. गुरे विकत घेताना करतात तशी चिकित्या व घासाघीस स्त्रियांच्या क्रयविक्रीसाठी केली जाते. सुशिक्षित व संस्कृत समाजात सुध्दा हाच प्रकार घडतो.

मुली विकल्या जाणाऱ्या या साऱ्या व्यवहाराला येथे ''लग्न'' असे गोंडस नाव आहे. अशावेळी स्त्रिची किंमत टी.व्ही. फ्रीज, स्कूटर अशा वस्तूंशी केली जाते. ती मिळाली नाही की, तिचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरु होती.

कंटाळून आत्महत्या करते कायद्याची कणमात्रही तमा न बाळगता हुंडा दिला जातो. अशावेळी मुलीची काय इच्छा आहे ? हे कोणीही लक्षात घेत नाही. अशा व्यवहारात तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते. या सगळ्या गोष्टी झाल्या पैशांकरीता स्त्रीवर होणारे बाकीचे अत्याचारही कमी नाहीत. स्त्रीला सुध्दा भावना असू शकतात हे कोणी पुरुष मानतच नाही. सतीची चल बंद होऊन शंभर वर्ष झाली, तरी सुध्दा ''रुपकंवर'' सारख्या स्त्रीला सर्व गावासमक्ष सती नावे लागते स्त्री ही माणूस आहे. या जाणीवेतूनच आपल्या कायद्याने तिला पुरेपुर सरंक्षण दिले आहे. परंतु आपली पुरुषप्रधान संस्कृती तिला माणूस मानायला तयार नाही. हा समाज स्त्रीला तिची योग्य जागा देत नाही. स्त्री ही आपल्यासारखी आहे हे सहजासहजी मानणे कठीण आहे. पण तिला माणूस समजण्यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे.

स्त्रियांची पिडा इतकी वाढली आहे की, तिला जन्माच्या आधीच मारुन टाकण्यात येत आहे. आईची इच्छा नसतानाही तरी तिला वाईट काम करावे लागत आहे. कारण तिच्या पतीच्या घरचा हा निर्णय असतो. जर पतीच्या मनाविरुध्द वागल्यास तिला फारकत किंवा तिच्यावर अत्याचार केला जातो. एवढेच नव्हे, तर मुलगी जसजशी मोठी होत जाते तिला प्रत्येक गोष्टीमध्ये तिच्या भावनेचा बळी द्यावा लागतो. शाळेमध्ये जात असताना तिला वेगवेगळ्या वस्तूची व आई-वडिलांची आवश्यकता असते. मात्र तिला मदत मिळत नसते त्यामुळे ती भित्री बनते. आपल्या मनातल्या गोष्टी तिला मांडता येत नाही. असे समोर

वारंवार घडत असते. घराबाहेर पडताच तिला विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. तिला नाही त्या गोष्टी ऐकाव्या लागतात आई-वडिलांच्या घरी तिचे निर्णय वडील घेतात आणि लग्न झाल्यावर पती तिचे निर्णय ठरवित असते लग्नानंतर तिला वेगवेगळे अन्याय सहन करावे लागतात. आई-वडील मुलीला लहानाचे मोठे करुन तिला एका परक्या माणसाच्या सोबत पाठवितात. तिची बोली लावतात, म्हणजे ''हुंडा'' हा दोन्ही पक्षातील गुप्त व्यवहार असतो. परंतु जेव्हा वरपक्ष सातत्याने वधूपक्षाला जास्तीच्या हुंड्याची मागणी करतो आणि त्यासाठी वधूचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो. तेव्हा त्यातून वधू स्वतःला जाळून घेते किंवा मोठ्या प्रमाणात सासरची मंडळी तिला जाळून, मारुन टाकतात. सासरच्या लोकांच्या धनलाभाचे हे प्रत्यंतर असते. निम्म आणि उच्चवर्गापेक्षा मध्यमवर्गात हुंडाबळी प्रकरणे जास्त आहेत विवाहनंतरच्या काही वर्षात हुंडबळी जास्त होतात हुंडबळी हिंदू धर्मीयात महत्तम आहे. हुंडाबळी हे समाजातील काही घटकांच्या अपवृत्तीचे लक्षण आहे. त्यातूनही स्त्रियांचा दर्जा स्पष्ट होतो. सर्व घरातील स्त्रियावर हे अन्याय होत असत पत्नीला मारहाण करणे, लाथा मारणे, चटके देणे, काठीने मारणे हे बहुतांशी स्त्रिया सहन करतात. आधूनिक समाजात स्त्रियांच्या छळाची नवीन समस्या निर्माण झाली. त्यासाठी पुरुषप्रधानता, पुरुषाची कामुकता आणि स्त्रियाप्रती त्याचा भोगवादी दृष्टिकोन कारणीभूत आहे. ग्रामीण भागापेक्षा नगरात आणि त्यापेक्षाही महानगरात स्त्रियांच्या छेडखानीचे प्रमाण जास्त आहे. शहरातील गर्दी, अनामिकता, गर्दी नसलेले रस्ते, सिनेमागृह, रेल्वे, बसथांबे, रात्रीची वेळ इतकेच नाहीतर कार्यालयात छेडखानी केली जाते, बऱ्याच स्त्रिया अशा छेडखानीकडे दुर्लक्ष करतात. त्यामूळे गुन्हेगारांचे फावते व त्यांना शिक्षा होत नाही.

पळवून नेणे ही एक गंभीर समस्या झाली आहे. १६ वर्षाखालील मुलीला आमिष दाखवून पळवून नेले जात आहे. अपहरणाच्या कारणात कामवासना पूर्ण करणे, बळजबरीने विवाह करणे, वेश्यालयात विकी करणे इत्यादी गोष्टी आढळतात. पळवून नेणारे पुरुष व स्त्रिया दलाल असतात. महाराष्ट्रातील पळवून नेलेल्या मुलीची उत्तर प्रदेशात विक्री केल्याचे आढळले. पळवून नेण्यामागे पुरुषीवृत्ती असून एकप्रकारे स्त्रियांना वस्तू व विक्री करण्याजोगा घटक मानण्यात येते. यातून स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. स्त्रियांविरुध्द होणाऱ्या अत्याचारात बलात्कार प्रमुख आहे. भारतात बलात्कार ही गंभीर समस्या ठरली आहे. बलात्कार एका व्यक्तीने आणि काहीवेळा समुहाने केलेले आढळतात. त्यात स्त्रियांच्या असहाय स्थितीचा, तिच्या एकटेपणाचा, अंधाराचा फायदा घेण्यात येतो. बलात्काराने ग्रस्त महिलेच्या मनावर आघात होतो. त्यातून स्वतःला जाळून घेणे, आत्महत्या करणे असे प्रकार घडतात. लोकांत अप्रतिष्ठा होईल आणि त्याचा भावी जीवनावर परिणाम होईल म्हणून बलात्कार मुक्याट्याने सहन केला जातो. परंतु याचा गैरफायदा होऊन सतत शारीरिक शोषणसुध्दा केले जाते.

काहीवेळा बलात्कारातून कुमारी मातांचा प्रश्न, जन्मास येणाऱ्या अर्भकाचा प्रश्न उद्भवतो. गावठी पध्दतीने गर्भपात केल्यास माता मृत्युची संभावना असते. भारताला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली मात्र स्त्रियांना आणखीही स्वातंत्र्याचा श्वास घेता अलेला नाही. स्त्री जन्मापासून मृत्युपर्यंत दुसऱ्यावर आधारलेली आहे, ती परावलंबी आहे हे सिध्द होत आहे.

स्त्रियांच्या अपमानित होण्याचे मूळ कारण स्त्रीच आहे, कारण स्त्रिया जर स्वत:ची काळजी घेऊ लागली तर सर्व समाज तिची काळजी होईल. तिच्या भावना समजल्या जाईल. स्त्री स्वत:च्या हाताने आपल्याप पयावर ती कुऱ्हाड मारत चालली आहे. आता सर्व ठिकाणी फॅशनचे वेड लागलेले आहे. जिकडे-तिकडे सर्व ठिकाणी स्त्रियांच्या फोटो दिसत आहेत. उदा. दाराच्या पृष्ठभागावर, दुकानावार, पुस्तकावर, वह्यावर, बस स्टॉपवर, रोडवर पोस्टर चिटकवलेली दिसतात. आज स्त्रीची रक्षण करणारे पुरुष तेच भक्षक बनले आहेत. आता स्त्री स्वत:च्या पायावार उभी राहण्यासाठी आपला देह विकत आहे. आपल्या सौंदर्यात भर पाडण्यासाठी मॉडेलिंग करत चालली आहे. त्यांच्या केश-भूषेत वेश-भूषेत खूप बदल होत आहेत. जी स्त्री साडी, लुंगडे घालायची ती आता अतिशय कमी कपडे घालत चालली आहे. यामुळे समाजावर वाचा वाईट परिणाम दिसून येत आहे. पडद्यावर पाहण्यासारखा एकही सिनेमा राहिला नाही.

तुका म्हणे काय नटोनिया व्यर्थ ।<br>
आपुले हे चित्त आपण ग्वाही ।<br>
असे जरी संतानी म्हणले असेल तरी<br>
आजचे ।<br>
युग हे फॅशनचे युग आहे,<br>
आज फॅशन ही मानवी जीवनाशी अविभाज्य संबध<br>
असणारी गोष्टी झाली आहे

प्रत्येक नव्या दिवशी काळापेक्षा वेगळ्या नव्या गोष्टीचे आगमन होत आहे आणि अनुकरणशील असलेली आमची तरुण पिढी नाविण्यपूर्ण गोष्टीचे मोठ्या उत्साहाने स्वागत करीत आहे. नवे नेहमीच हवे असते, कारण त्यात बदल असतो आणि हा बदल नव्या पिढीच्या फॅशनच आकर्षणाचे एक प्रमुख कारण आहे. या फॅशनमुळेच अनुकरणीय अशा अनेक चांगल्या गोष्टीकडे आमचे दुर्लक्ष होऊ लागले आहे.



फॅशनने तरुण मनाची इतकी पकड घेतली आहे की, फॅशनचे वेड पुरवतांना सभ्यासभ्यता, संस्कार यांचा विवेक सुटला आणि कमीत-कमी किंवा कमी कपडे घालून देह प्रदर्शन करत समाजात वावरण्याची फॅशन दिसू लागली आहे. या फॅशनमुळेच आमचा मौल्यवान वेळ वाया जात आहे, खरे म्हणेज सांगण्यास तासण्याच हीच अशी अमुल्य गोष्ट आहे की, मुद्दाम शरीर नटवायला नको. अशी भावना मनात झालेली आहे. चेहरा कितीही गर्दीत दिसतो, यांच्याकडे सगळ्याचे लक्ष वेधले आहे. स्वातंत्र्य मिळून आता चार-पाच तपांचा काळ संपत आला तरी अजून आमचे वैश्यदारिद्रय संपले नाही. अशावेळी तरुण-तरुणांनी या फॅशनच्या मागे न लागता समाजउभारणीचे हे काळाचे अव्हान आता स्वीकारले आहे. या समाजाने स्त्रीला बेकार परिस्थितीवर आणून उभे केले आहे. या पृथ्वीवर स्त्रियांना मोकळा श्वास घेण्यास अडथळा निर्माण होत आहे. येथील वातावरण दूषित झालेलं आहे, स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा, आदर्शाचे, आदराचे स्थान केव्हा मिळणार ?

सांगा....

**चव्हाण ऋतुजा**
(एफ.वाय.बी.एस.सी.)

# आजची स्त्री सबलीकरण यशाचे गमक.



गगन भरारी तुझी आकाशी, हवेप्रमाणे तुझी गती. मानवी तूच, कठीण तूच, अमृताचा प्याला. तूच या मानव जातीची शामबाला तू तीच जिच्यामुळे मानव वंश जन्मला.

स्त्री ही स्त्री नसून संपूर्ण मानवजातीची माता आहे. स्त्रीही कोणाच्याही बंधनातील पंची नसून मानवी जीवनाचा सार आहे. मानावाच्या कल्याणाची व समाजाची जडण-घडण, करणारी नारी आजच्या या युगामध्ये आपले खरे वर्चस्व निर्माण करण्यास सुसज्ज झाली आहे. आजच्या दैनंदिन परिस्थितीचा विचार केला असत, माणसापेक्षा अधिक मोठ्या प्रमाणामध्ये स्त्रीने आपले वर्चस्व, आपले अस्तित्व निर्माण केले आहे. जी स्त्री आजपर्यंत या मानवाच्या विळख्यामध्ये अडकवून होती ती आता स्वतंत्र्य होत आहे. आजच्या २१ व्या शतकातील स्त्रीचा विचार केला असता आपल्या औद्योगिक, जागतिक, सामाजिक, आर्थिक, बौध्दीक व मानसिक प्रगतीमध्ये आजची स्त्री ही सरस व गुणवंत ठरत आहे. कोणत्याही क्षेत्राचा विचार केला असता, आपल्याला स्त्रीही पुरषांच्या एक पाऊल पुढे जावून कार्य करताना दिसते. अशा या प्रगतशील स्त्री व्यक्तीमध्ये ज्वलंत असे उदाहरण द्यावयाचे असेल तर आपल्याला कल्पना चावला, सुनीता विलियम्स, किरण बेदी, पी.टी.उषा, लता मंगेशकर अशा उनेक स्त्रियांनी आपल्या भारतीय समाजातील स्त्री यांना प्रेरणा देण्यासाठी येथे प्रगतीचा, शौर्याचा पाया घातला आहे. आधी याच्या जोरावर आज आपल्या या २८ प्रांत व ८ केंद्रशासित प्रदेश व लोकशाही शासनपद्धती असलेल्या या भारताचे सर्वोच्च व्यक्तिमत्व म्हणून कार्य करणारी स्त्री आहे. ते महान व्यक्तीमत्व म्हणजे प्रतिभाताई पाटील, व द्रौपदी मुर्मू हे होय. १४१ कोटी जनता असलेल्या या बलाढ्या भारताची लगाम आजच्या या प्रगत स्त्रीयांनी आपल्या हाती घेतली आहे. अशा या स्त्री राष्ट्रपती होण्याचा सर्वप्रथम मान आशिया खंडातील फिलीपाईन्सची मारिया कॅरीझोन ही पहिली राष्ट्रध्यक्षा म्हणून गणली. आपल्या भारत देशामध्ये पुरुष प्रधान संस्कृती असल्याने पुरुष स्वत:ला सर्वस्व व स्वाभिमानी समजतो. आपल्या समाज जिवनामध्ये आपल्या खांद्यायाला खांदा लावून चालणारी स्त्री त्याला तुच्छ वाटते. पण ज्या मानवी व्यक्तीमध्ये ज्या मानवाने स्वत:च स्वत:ला ओळखले आहे. असे पुरुष आज आपल्या यशाचे गमक स्त्रीलाच मानतात. पूर्वीच्या काळाचा विचार केला असता, जगज्रेता सिकंदरही आपल्या आईच्या समोर नतमस्तक होतो. तर स्वराज्य निर्माण करणारा शिवाजी राजा आपल्या मातेला काय ? पाहून घ्यावे. जननी मानतो. ''प्रत्येक वीर पुरुषांच्या मागे एका स्त्रीचा हात असतो.'' हे जे काही म्हटले आहे, ते काही खोटे नाही. मग अशा या स्त्रीला तुच्छ मानणारा मानव वर्ग म्हणजे या समाजाला लागलेली कीड होय. अज्ञानी लोकांनी आपल्याच हातांनी आपल्या प्रगतीला आळा घालणे होय. अशा पुरुषांनी प्रगतीचे पंख असलेल्या स्त्रियांना ''चूल आणि मूल'' या शब्द बंधनाने बांधून टाकले आहे. स्त्री ही मनुष्य उपभोगाचे साधन आहे. असे समजणाऱ्या उच्च व श्रेष्ठ वर्गामध्ये स्त्रियांवर असणारे बंधने या मानवाने अनिष्ट चाली, रितीरिवाज परंपरा यांच्या सहाय्याने स्त्रीचे स्वातंत्र्य भेद केले आहे. एक आई आपल्या मुलांना नऊ महिने, नऊ दिवस आपल्या उदरामध्ये ठेवते आणि जन्म देते व त्याला विश्वदर्शन घडवून देते. असा हा घमंडी माणूस त्याच उदरावर आपला अधिकार सांगतो. म्हणजे ! अशा या मानवच्या वर्तनानेच आज भारतामधील परिस्थिती अशी राहिली आहे. अन्यथा या देशामध्ये स्त्रीला स्वातंत्र्य असले असते तर भारत हा जगातील महासत्ता बनला असता !

इतिहासाची पाने चाळली असता, आपल्या भारतामध्ये अनेक स्त्रियांनी स्त्रि हलाखीच्या परिस्थितीवर मात करुन आपले अस्तित्व कायम ठेवले व आजच्या प्रगत स्त्रिला प्रेरणा देण्याचे कार्य केले आहे. याचे एक उदाहरण म्हणजे १६ व्या शतकातील राष्ट्रमाता जिजाऊ होय. अशा या थोर माऊलीचा जन्म सरदार लखुजी जाधव आणि उमाबाई यांच्या पोटी इ.स. १५९५ मध्ये झाला आणि हे कन्यारत्न पुर्ण विश्वाला आपली पारख करुन गेले वयाच्या ८ व्या वर्षी लग्न झाले आणि त्या भोसले घराण्याच्या सून झाल्या. या भोसले घराण्याचा वीरपुरुष या मातेच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० मध्ये स्वराजाचे तोरण होवून शिवाजी राजा जन्माला आला आणि त्याने आपल्या मातेच्या संस्काराची लाज राखतांना शून्यातून स्वराज्य निर्माण केले. त्याचप्रमाणे झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने आपले राज्य इंग्रजांच्या स्वाधीन करायाचे नाही, यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहिल्या. लग्नानंतर झाशीची राणी मध्येच पतीचे निधन झाल्यानंतर आणि पोटचे वंश नसल्याने दत्तकपुत्र घेवून आपले राज्य चालविणारी मर्दाणी राणी होती

या प्रमाणे आपली स्त्रीही अबला असली तरही सबला होण्याची प्रेरणा आपल्या या दोन स्त्रियांपासून मिळते. त्याचप्रमाणे सामाजविळख्यात व चाली, रितीच्या काटेरी कुंपनात अडकलेल्या स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग दाखविणारी सावित्रीबाई फुले होय.

आपल्या पतीच्या पावलावर पावले टाकत चालणारी सावित्रीबाई फुले ह्या होय त्यांना आपल्या जिवणामध्ये जनकल्याणाचा मार्ग अवलंबला आणि या दोघांनी पुण्यामध्ये पहिली मुलींची शाळा १८४८ मध्ये काढली आणि अज्ञानी स्त्रीला शिक्षणाचे द्वार खुले केले. त्या शाळेमध्ये शिक्षण किंवा मुलींना शिकविण्यासाठी शिक्षण नसल्याकारणाणे स्वत:महात्मा फुले यांनी आपल्या पत्नीला सुज्ञ करुन आपल्या शाळेतील मुलींना शिकवण्याचे कार्य केले आणि तेव्हापासून मुलींमध्ये ज्ञानदीव्याच्या प्रकाश फैलत असल्याचे दिसून येते.

कल्पना चावला जिने गगनभरारी घेतली आणि भारताचे, संपूर्ण स्त्रीजातीचे नाव रोषण करण्याचे कार्य केले आहे. त्याचप्रमाणे पी.टी. उषा हिने धावण्याचा स्पर्धेमध्ये मोलाचे कार्य केले आहे. वक्रिगवरी स्वातील नामांकित पुरस्काराने तिला सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये ''अर्जन पुरस्कार'' हा क्रीडाक्षेत्रातील सर्वात उच्च पुरस्कारांनी तिला सन्मानित करण्यात आले आहे. याचप्रमाणे भारतीय वंशाची अमेरिकेमध्ये वास्तव्य करणारी सुनीता विलीयम्स हिने आपल्या कौशल्यच्या जोरावार संपूर्ण स्त्रीजातीचे नाव करण्याचे कार्य केले आहे.

अवकाश यानातून गगनभरारी घेणारी ही भारतीय वंशाचीच स्त्री आहे. हे आजच्या प्रगत स्त्रीचे उत्तम उदाहरण आपल्या डोळ्यासमोर ठेवता येईल. नुसते शौर्याचा कार्यातून मुलींच्या स्वबळावर अनेक क्षेत्रामध्ये त्या आपले कौशल्या दाखवितात. ज्या प्रमाणे गायन क्षेत्रामध्ये लता दीदी यांना ''गाण कोकिळा'' म्हणुन संबोधल्या जाते तर सौदर्यांच्या बाबतीतही आपल्या भारतीय स्त्रीने काहीकसर सोडली नाही. ''ऐश्वर्या रॉय'' या स्त्रीने आपल्या सौदर्याच्या जोरावर''मिस इंडिया'' हा अवॉर्ड संपादन केला एवढेच नाहीतर राणी लक्ष्मीबाई यांचे प्रतीक असलेली भारताची पहिली महिला पुलीस अधिकारी म्हणून किरण बेदी ही एक स्त्री असताना यांच्या यशस्वी आणि तेजस्वी कर्तृत्वीची जाणीव होऊन १० ऑक्टोंबर १९८० मध्ये त्यांना ''पोलिस मॅडल कौर गॅलट्री'' हे शोर्यपदक प्रदान करण्यात आले.

तसेच ''बूयन ऑफ द इयर'' म्हणूनही घोषित करण्यात आले. अशा या किरण बेदी आजच्या सबळ स्त्रीला सूचवतात ''प्रवाहविरुद्ध पोहणे फार कठीण असते, पण ज्यामुळेच जिथे कोणीही जावु शकत नाही अशा ठिकाणी अखेर तुम्ही पोहोचता'' अशा या अभिवचनाचा आदर्श घेवून आजची स्त्री ही मिल्ट्री, पोलिस, सी.आर.पी., सी.आय.डी.इ. रक्षक पथकाचेही कामे स्त्री करुन इच्छिते आहे.

आजची स्त्री प्रगतीच्या मार्गाने सतत मार्गक्रमण करीत आहे आणि या सर्वाचं कारण म्हणजे आजच्या समाजामध्ये झालेला बदल होय. स्त्री-पुरुष समानता यांचा गुणधर्म आत कोठे माणसांमध्ये रुजतांना दिसतो आहे आणि याचे श्रेय म्हणजे आजचे स्त्री सबलीकरण होय.

**यशोदा नितीन भळगट**
(एम.एस.सी., मॅथ्स्)

# भारतीय महिलांच्या चळवळी



**वर्गीकरण :-**

वेगळेवेगळे अभ्यासक स्त्रियांच्या चळवळीचे वर्गीकरण आपापल्या तात्विक दृष्टिकोनाप्रमाणे करतात. नीरा देसाई म्हणतात. ''स्त्रियांची चळवळ म्हणजे समानता आणि स्वातंत्र्य हे समान ध्येय मिळविण्यासाठी केलेला संघटित प्रयत्न आणि स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या निर्णायक बाबीविषयी संवेदनशीलता त्याप्रमाणे गृहीत धरलेली असते. एखादी संबंधित क्रिया उद्देशाकडे जाणाच्या दृष्टिने विविध एककांमध्ये त्यांना बांधणारा आदर्शवादी धागा असावा लागतो. त्यावर आधारित चळवळ उभी राहते.''

**सामाजिक सुधरणेच्या चळवळी आणि स्त्रिया .**

भारतात चालू असलेल्या स्त्रियांच्या चळवळीचा उगत गेल्या शतकात हिंदुस्थानमध्येच झालेल्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीमध्ये सापडतो.

स्त्रियांसाठी काम करणाऱ्या पुढाऱ्यांनी राजकीय हक्कांची, समान मतदानाच्या अधिकारी आणि संसदेत प्रतिनिधी मागणी केली आणि या मागणीला काँग्रेस पक्षाचा पाठींबा होता स्त्रयासाठी शिक्षणाचा प्रसार कारण्यासाठी १९२० साली वुमेन्स इंडियन असोसिएशन आणि ऑल इंडिया या संस्था अस्तित्वात आल्या होत्या. त्यांना अखिल भारतीय ही पदवी प्राप्त झाली. तिसेच स्त्रियांना घराबाहेर काम करण्यासाठी त्यांच्या विरोध नव्हता. हिंदू धर्माने जरी स्त्रियांना गौण स्थान दिले होते तरी स्त्री-पुरुष तत्वाने द्वेत्व शिव-शक्ती आणि वैदिक काळातील स्त्री-पुरषांची समानता यामुळे हिंदू पुनरुज्जीवनवादी सुधारकांना स्त्रियांचे स्थान सुधारण्यासाठी पाठबळ मिळाले.

उदा पद्धतीमुळे स्त्रियांना पुरुषांपासून वेगळे ठेवण्यात आले आणि त्यांचा सार्वजनिक जीवनातील सहभागही नाकारण्यात आला. त्यामुळे स्त्रियांना एका प्रकारची दृढ ऐकयाची भावना मिळाली. या पडदा पद्धतीच्या आदर्शवादी ध्वन्वार्थामुळे पूर्वीच्या स्त्री चळवळीच्या पुढाऱ्यांना संयुक्त ध्येयाकडे नेले.

स्वातंत्र्यसंग्राम आणि स्त्रिया :-

स्वातंत्र्यच्या चळवळीत स्त्रियांच्या सहभागाने भिन्न वळण घेतले आणि तो सहभाग नेहमी सुसंघटित आणि सुसंबध नव्हता उदा. पश्चिम भारतात महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी देशभक्तीची भावना जागण्यासाठी प्रभातफेरी निघत असे. सर्व भारतभर असंख्य स्त्रिया निर्वासित आणि भूमिगत व्यक्तीना अन्न पुरवत असत, राजकिय कैंदाना भेटत असतं. सर्व बाह्या गोष्टीपासून सुरक्षित असलेल्या घराच्या बाबतीत नवीन आणि बाह्य उत्तेजनांशी सामना करत असत. स्त्रियांच्या चळवळीतील बहुतेक सहभाग हा अशाच स्वरुपाचा समाज आणि घर यांच्यावार आधारित होता.

लोकांच्या चळवळी आणि स्त्रिया :-

निरनिराळ्या चळवळी - स्वातंत्र्याची चळवळ, शेतकऱ्यांची चळवळ, जमातीच्या चळवळी, विद्यार्थ्यांच्या चळवळी या  सर्व लढ्यामध्ये स्त्रियांची भूमिका आणि सहभाग यासंबंधी बरेच अभ्यास, चर्चा करतात. या चळवळी स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या, मुद्दाबद्दल काही आवाज उठवित नाहीत, परंतु सामाजिक आणि वर्गीय मुद्यासंबंधी आवाज उठवतात. स्त्रियांनी सामाजिक आणि राजकीय चळवळीमध्य वैशिष्ट्यपूर्ण भूमिका बजावली आहे.

जिचा अजून पुरता अभ्यास झालेला नाही आणि जिचे स्पष्टीकरण मिळालेले नाही. या भूमिकेची चुकीची जाण नेहमी इतिहास लेखणाच्या बाबतीतील तात्विक कमकुवतपणाशी जोडली जाते. खास करुन स्त्रियांच्या भूमिका आणि त्यांच्या सहभाग याच्यावर लक्ष ठेवून या चळवळीचा पुन्हा अभ्यास होऊ लागला आहे. स्त्रियांच्या अदृश्य सहभाग पुढे आणतात. १९८४ साली या विषयांवर,''साम्य शक्ती'' नावाचा स्त्रियांच्या मासिकांचे एक खास अंक काढला आहे. लोकांच्या विविध चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग यावर भरत देऊन या अंकाचे स्पष्टीकरण संपादकाने दिले आहे.

स्त्रियांच्या समस्यांवरील स्त्रियांची चळवळ

स्त्रिया म्हणजे सतत दबावाखाली राहणारा गट आहे, हे समजून घेण्यात आलेले अपयश, समस्या कोणतीही असो, गर्भपात किंवा गर्भनिरोधक दोन्हीमधला संबंध स्पष्ट केलेला नसतो. मुलाला पोटात वागविणे आणि मुल वाढविणे या दोन्हीमधील दूवा म्हणून सामाजिकदृष्ट्या त्यात असलेले परिश्रम समजून घेतले जात नाही, नको असलेले गर्भ वाढविणे ही एकच समस्या ही एकच समस्या केंद्रित केली जाते, जूलूम जर अनेक जणीमध्ये वाटून घेतला तर त्यामुळे एकत्र असण्याची एक दृढभावना स्त्रीला मिळते की, जी स्थिर संघटनेसाठी योग्य पाया बनू शकते. परंतु ती भावना शक्ती देऊ शकत नाही. जिचा उपभोग जूलूमविरुध्द चालू असलेल्या रेगांळलेला लढा सोसण्यास ताकद देईल.

**अंजली बाळू अनारसे**

(एम.एस.सी–२)

नवनिर्वाचित राष्ट्रपतींचे पहिले भाषण

# ''मो जीवन पढे नर्के पडी थाउ, जगत उद्धार हेउ''।



नवनिर्वाचित राष्ट्रपतींचे पहिले भाषण...
''मो जीवन पछे नर्के पडी थाउ, जगत उद्धार हेउ''

''मो जीवन पछे नर्के पडी थाउ, जगत उद्धार हेउ'', म्हणजे आपल्या जीवनातील हित आणि अहिता पेक्षा जगाच्या कल्याणासाठी काम करणे हे मोठे कार्य आहे. श्री जगन्नाथ क्षेत्र येथील प्रसिद्ध कवी भीम भोई जी यांच्या काव्य पंक्तीचा आधार घेत देशाच्या पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी महान भारताची संकल्पना साकारण्याचा प्रयत्न केला. या पदावरून पहिलेवहिले भाषण करताना त्या म्हणाल्या, विश्व कल्याणाची भावना बाळगून आपणा सर्वांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी, संपूर्ण निष्ठा आणि समर्पणाने काम करण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. समृद्ध आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने समर्पित भावनेने कर्तव्य पथावरुन वाटचाल करावी असे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या संबोधनातला नव भारताचा विचार आणि त्यासाठी कोणते संकल्प आहेत यावर एक नजर :

दृढ निश्चयाने महाविद्यालयात जाणारी आपल्या गावातली ती पहिली मुलगी ठरली. आदिवासी समाजात जन्मलेल्या द्रौपदी मूर्मू यांचा नगरसेविका या पदापासून भारताचे राष्ट्रपती पद भूषविण्यापर्यंतच्या प्रवासातून लोकशाहीची जननी असलेल्या भारताचा महान वारसा प्रतीत होत आहे. एका गरीब घरात, दूर्गम आदिवासी भागात जन्मलेली मुलगी भारताच्या सर्वोच्च संवैधानिक पदापर्यंत पोहोचली आहे हे भारताच्या लोकशाहीचे सामर्थ्य आहे. राष्ट्रपती म्हणून शपथविधी झाल्यानंतर केलेल्या भाषणात द्रौपदी मूर्मू यांनी राष्ट्राच्या या कामगिरीबद्दलच्या आपल्या भावना या शब्दात व्यक्त केल्या, ' राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचणे हे माझे वैयक्तिक यश नसून भारतातल्या प्रत्येक गरीब व्यक्तीचे हे यश आहे. माझी निवड म्हणजे भारतात गरीब माणूस स्वप्ने पाहू शकतोशकतो आणि ती प्रत्यक्षात आणू शकतो याचेच हे प्रतीक आहे. माझ्यासाठी ही आनंदाची बाब आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून जे वंचित राहिले आहेत, विकासाच्या लाभापासून दूर राहिले आहेत ते गरीब मागास आणि आदिवासी माझ्यात आपले प्रतिबिंब पहात आहेत. माझ्या या निवडीमध्ये देशातल्या गरीब जनतेचा आशिर्वाद आहे. देशातल्या कोट्यवधी महिला व मुलींची स्वप्ने आणि सामर्थ्य यांची झलक आहे. माझ्या या निवडीमध्ये मळालेल्या वाटा सोडून नवीन मार्गावर वाटचाल करणाऱ्या भारताच्या आजच्या युवकांच्या साहसाचाही समावेश आहे. अशा प्रगतीशील भारताचे नेतृत्व करणे हा मी माझा गौरव मानते. द्रौपदी मूर्मू या स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या भारतात ज्यांचा जन्म झाला आहे, अशा पहिल्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. द्रौपदी मूर्मू यांच्या राष्ट्रपतीपदी झालेल्या निवडीमुळे देशातील जनतेत निर्माण झालेल्या उत्साहाची झलक त्यांच्या निवडीपासून ते शपथविधी समारंभापर्यंत स्पष्ट दिसून आली. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी भारताने इतिहास घडविला आहे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

शब्दांकन
प्राचार्य डॉ. एस.एन.राठी

# "महिला सम्मान योजना बस प्रवासात ५०% सूट"




**Mahila Samman Yojana Maharashtra 2023 :**

महिलांना ST प्रवासाला आज पासून ५० टक्के सूट

महिला सन्मान योजना १७ मार्च २०२३, आज रोजी महाराष्ट्र सरकारच Mahila Samman Yojana महिला सन्मान योजना ऋठ आला ज्यात महाराष्ट्रातील महिला एसटी प्रवास सरसकट ५०% सूट तिकिटावर करू शकतात.: महिलांना डढ प्रवासाला आज पासून ५० टक्के सूट

महिला सन्मान योजना १७ मार्च २०२३: आज महाराष्ट्र सरकारच Mahila Samman Yojana महिला सन्मान योजना ऋठ आला ज्यात महाराष्ट्रातील महिला एसटी प्रवास सरसकट ५०% सूट तिकिटावर करू शकतात.

महाराष्ट्र राज्याच्या २०२३-२४ अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्रातल्या महिलांना चरहळश्र डरारप धेक्षरपर या राज्य सरकार योजनेच्या अंतर्गत राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाडयामध्ये ५०% सवलत मिळणार आहे. हि घोषणा आज दिनांक १७/०३/२०२३ रोजी झाली असून महिलांना महाराष्ट्रातच राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाड्यामध्ये ५०% सवलत मिळाली आहे.

या योजनेची प्रतिपूर्ती रक्कम शासनाकडून महामंडळाला मिळणारे आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसेस यात साधी, एसटी, मिडी, मिनी, निमआराम, विनावातानुकुलीत शयन-आसनी, शिवशाही (आसनी), शिवसेनेरी, शिवाई (साधी आणि वातानुकुलीत) या बसमध्ये आजपासून Mahila Samman Yojana ५० टक्के सवलत सर्व वयोगटातील महिलांना मिळणार आहे. तसेच यापुढे ज्या नवीन गाड्या उपलब्ध होतील त्यामध्ये ही सवलत मिळणार आहे. या मुळे महाराष्ट्रातील महिलां खूपच आनंदीत असून या अगोदर महिला सन्मान योजना ५ ते १२ या वयोगटातील मुलींना यापुर्वी प्रमाणेच ५०% सवलत अनुज्ञेय राहिल. सदर योजना ही 'महिला सन्मान योजना' या नावाने संबोधण्यात येत आहे. सदर महिला सम्मान योजना २०२३ सवलत शहरी वाहतूकीस अनुज्ञेय नाही. सदरची सवलत सर्व महिलांना महाराष्ट्र राज्याच्या हद्दी पर्यंत अनुज्ञेय आहे. ज्यां महिलांनी अगोदर तिकीट बुकिंग केलं असेल त्यांना हा लाभ मिळणार नाही अशी माहिती मिळते आणि असे शासन आदेशात स्पष्ट नमुद करण्यात आले आहे. या ऋठ मध्ये देखील सांगितलं आहे ज्या महिलांनी रा.प. महामंडळाच्या बसेसचे प्रवासाचे आगाऊ आरक्षण तिकीट (Advance Booking) घेतलेले आहे. अश्या महिलांना Mahila Samman Yojana ५०% सवलतीचा परतावा देण्यात येऊ नये.

संग्रहित-डॉ. सुपर्णा देशमुख

# Women Empowerment: Need of an Era

Woman is an incarnation of ‘Shakti’ - the Goddess of Power. If she is bestowed with education, India’s strength will double. Let the lamp of educating daughters be lit up in every heart. Narendra Modi

Women's strength, bravery, wisdom were known to all from God. In the Puranas, woman power is also worshiped. Therefore, women's empowerment is not only modern but also mythical. In the changing circumstances, however, the role of a woman has changed. Beyond the roles of daughter, daughter-in-law, wife, mother, she is an officer, scientist, teacher, employee, owner, in many forms. There are many aspects to her life. And she has given them more shine in her duty. She has given a new direction to her intellect and self-esteem. There is no area in today's world where there is no woman. In each field she is ahead of men but she still has a lot to try. The development has already taken place but not exhaustive. Some sections of society have gone too far. But, some classes are lagging behind that did not develop. Mahatma Gandhi in his 'Experiments with Truth' argues that it is libel to call woman a weaker sex, it is man's injustice to woman. Many women are still caught in the bondage of illiteracy, superstitions, beatings of their husbands, dowry. They have not even got the direction to change. Their day begins before the hens arrive and ends at night. Today many of us are women doctors, engineers, teachers, leaders, actresses, ministers, even in the top positions in the country. At the same time, many women in the village die while giving birth to children, they are burnt due to lack of dowry but they are not getting justice. Their news does not even appear in the newspapers. There is no agitation for their rights.

The term ‘Empowerment’ may be described as a process which helps people to assert their control over the factors which affect their lives. Empowerment of women means developing them as more aware individuals, who are politically active, economically productive and independent and are able to make intelligent discussion in matters that affect them. Woman empowerment is seen as the process and the result of the process of: challenging the ideology of male domination and women’s subordinations. Empowered women maintain equal mindset as compare to men. They act out roles that challenge male dominance. The principle of gender equality is mentioned in the Indian Constitution in its Preamble. Women have equal Fundamental Rights and Fundamental Duties. The Constitution gives equality to women. Now a day, the empowerment of women has been recognized as the central issue in determining the status of women. Human rights secure equal rights of women. The National Policy for the Empowerment of Women was passed in 2001. Empowerment means accepting and allowing people (women) who are on the outside of the decision-making process into it. It is the process that creates power in individuals over their own lives, society, and in their communities. People are empowered when they are able to access the opportunities available to them without restrictions such as in education or profession. Empowerment includes the action of raising the status of women through education and literacy. Women's empowerment is about allowing women to make life-determining decisions through the different problems in society. Women empowerment has become a significant topic of discussion in development.

Women's economic empowerment refers to the ability for women to get income. Economic empowerment increases women's chances to go outside the house. For that purpose economic independence and more opportunities regarding formal education should be provided to women to get job opportunities so that they could get higher wages outside the home but job training is also necessary for them. Strengthening women's access to property rights is another method used to empower women economically. Women in developing and underdeveloped countries are legally restricted from their land on the sole basis of gender. In employment, race has a huge impact on women's empowerment. . Work opportunities and the work environment can create empowerment for women. Colour of women is another factor at workplace. Such women face more

disadvantages in the work place. As far as economic empowerment of women is concerned, micro finance groups are really motivating rural women to enter in small scale industries. The role of government is also important for this. The modern woman is not as weak as she was seen in ancient period. She is strong and bold enough to strengthen the house. It is found in several villages that the head of the family is drunkard fellow and unable to contribute the house economically. In such cases, the role of women is become highlighted. They empower the family especially children, in their education. Her strong appearance in the house itself is a motivation for the rest of the family members and the society too. The strong reason for women's economic empowerment also includes microcredit. Microfinance institutions aim to empower women in their community by giving them access to loans that have low interest rates.

Education gives you information regarding prevention of several diseases. The role of education is highly important as far as the empowerment of women is concerned. It increases their self-confidence and also enables them to find better jobs and they can work shoulder to shoulder with men. It is an essential element of efforts to reduce malnutrition. Education can increase women's awareness of their rights, boost their self-esteem, and provide them the opportunity to assert their rights. The impact of internet in women empowerment is also noteworthy. With the introduction of the World Wide Web, women have begun to use social networking sites like Facebook and Twitter for online activism. In recent years, blogging has also become a powerful tool for the educational empowerment of women. Women's Day is celebrated all over the world on 8 March every year. Women in India comprise half of the

country ’ s population. The discrimination against the girl child begins in infancy. Girls are not given the best of medical treatment as compared to boys and they are not given the best of foods. Many girls in low income households grow up malnourished and suffer from anemia later in life. Sometimes girls are withdrawn from schools if the school is far away and especially when the school does not have a separate toilet for them. That is why the dropout rates for girls are much higher than boys in the middle and secondary schools. India is the fastest growing country in the world, but it becomes the most unsafe countries for women. Every day there are reports of violence against women in the news. The empowerment of women cannot happen without a change of attitude of men towards women but ensuring safety for women is the responsibility of the state.

There are certain barriers to women empowerment and equity. Many women feel these pressures. Research shows that the increasing access to the internet can also result in an increased exploitation of women. To release personal information on websites has put some women's personal safety at risk. Many women are being victimized through such fake sites. There are some types of victimization which include cyber stalking, harassment, online pornography etc. Sexual harassment is a large barrier for women at the workplaces. It is observed in almost all industries. It is most notable in business, trade, banking and finance, sales and marketing, hospitality, civil service, education, etc. According to the International Labour Organization (ILO), sexual harassment is a clear form of gender discrimination based on sex, a manifestation of unequal power relations between men and women. Another crucial factor is wage gap between men and women. It is been observed that women get less wages for the same work as compare to men. The question of maturity leave is raised by some people but it is a right of women according to the law. So, it is the need of the present era to empower the women for the better future of the society.

**Dr. Karale N.G.**
Asso. Professor
Dept of English

# वार्षिक अहवाल

# २०२२-२३

# अर्थशास्त्र विभाग

प्रस्तावता

भारतीची अर्थव्यवस्था दिवसेदिवस वाढत चालली आहे, भारतातील लोकसंख्येच्या विचार करता ३५ वर्षाखालील सर्वाधिक लोकांचा समावेश अतिकार्यक्षम गटात होतो. हीच बात भारताला महासत्ता होण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. गेल्या दशकभरात चीनने एक पाल्य योजना राबवली होती, त्यामुळे आता चीनमध्ये जेष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. परिणामी देशाच्या अर्थव्यवस्थेवर पेन्शन व आरोग्य सुविधामुळे ताण येत आहे, अमेरिकेवरील अवलबित्व कमी करत असतानाच भारताच्या पुढे दोन पावले राहण्यासाठी चीनला अर्थिक मंदीचा सामना करावा लागत आहे.

भारतावर कोरोना साथीचा विपरित परिणाम झालेला निदर्शनाला येतो, उत्पन्न, उत्पादन, रोजगार, आयात, निर्यात, निर्देशाकामध्ये घट झालेली आहे, महाविद्यालयातील विद्यार्थी पण Work from Home प्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत, परंतु याचा खुप मोठा परिणाम, विद्यार्थी, शिक्षक आणि समाज यावर होतांना पहावयास मिळतो.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी याच्या मार्गदर्शनानुसार आम्ही अर्थशास्त्र विभागात विविध उपक्रम राबविले आहे, या विभागाद्वारे स्पर्धात्मक युगाकडे रोजगाराच्या संधी, उद्योजकता, कृषी, अर्थशास्त्र, औद्योगीक अर्थशास्त्र, बैकिंग प्रणाली, जागतीकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिमाण इत्यादी विषयांवर सवांद घडुन आणला आहे.

महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांमधेय अर्थशास्त्र विषयाची आवड निर्माण व्हावी, भारतीय आणि जागतीक अर्थव्यवस्थेचे आकलन व्हावे यासाठी आमचे अर्थशास्त्र विभाग कार्य करत आहे, सन १९९६ पासुन अर्थशास्त्र विषय महाविद्यालायमध्ये अभ्यासक्रमात आहेत, अनेक विद्यार्थी अर्थशास्त्र विषयाची पदवी घेऊन आपआपल्या उद्योग, व्यापार, आणि सेवा क्षेत्रामध्ये जोमाने कार्य करत आहेत, सन २०२१-२२ पासुन महाविद्यालयात **Y.C.M.O.U.** चे अर्थशास्त्र विषय सुरु आहे, एम.ए. अर्थशास्त्र विषयास एकुण २५ विद्यार्थी प्रमथ वर्षामध्ये प्रवेशित आहेत.

अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. अशोक कोरडे हे पीएचडी चे मार्गदर्शक म्हणुन कार्य करत आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ७ विद्यार्थी Ph D करत आहेत. त्यापैकी दोन विद्यार्थ्यांना Ph D पदवी अवार्ड झालेली आहे, त्यांची विद्यापीठ, राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय स्तरावर अनेक पेपरचे लेखक, आणि वाचन केलेले आहे, एकुण पाच आंतरराष्ट्रीय संदर्भ पुस्तकाचे लेखन करुन प्रकाशन केले आहे, आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील डॉ. आण्णासाहेब शेळके यांनी राष्ट्रीय, विद्यापीठ स्तरावर पेपरचे लेखन आणि वाचन केलेले आहे.

**डॉ अशोक कोरडे**

# राज्यशास्त्र विभाग

गांधी माविद्यालामध्ये १९९६ पासून राज्यशास्त्र विभाग कार्यरत आहे. विभाग प्रमुख प्रा.डॉ. गोंदकर टि.डी. व प्रा.डॉ. तळेकर सी.के. कार्यभार पाहत आहेत.

राज्यशास्त्र विभागातर्फे विविध व्याख्याने अयोजित केली जातात. त्यामधून विद्यार्थ्यांच्या सर्वागिण ज्ञान प्राप्त व्हावे हा उद्देश असतो. त्याचबरोबर वर्षभर विविध उपक्रम व त्यामध्ये विभागाच्या विद्यार्थ्याचा सहभाग वाढवणे, विद्यार्थ्यांना राजकिय व सामाजिक ज्ञान मिळावे हा उद्देश असतो.

विविध राज्य , राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीचे सेमिनारमध्ये सहभाग व विविध नियतकालिकामध्ये दोन्ही प्राध्यापक शोधनिबंध प्रकाशित करत असतात दि. ३ व ४ मार्च २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व्याख्यान माला आयोजित करण्यात आली होती, यामध्ये प्रा.डॉ. विलास भाबदे, प्रा.डॉ. भाखडकर रमेश, प्रा.डॉ. मगर श्रीकांत, प्रा.डॉ. अनिल हजारे या तज्ञ प्राध्यापकांचे व्याख्यान आयोजित करण्यात आली होती.

या विभागाला प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, उपप्राचार्य प्रा.डॉ. ज.मो. भंडारी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

प्रा.डॉ. गोंदकर टि.डी.

# समाजशास्त्र विभाग

महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाद्वारे विद्यार्थांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात समाजशास्त्र विभागाद्वारे महात्मा गांधी जयंती, महात्मा फुले जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे आयोजन करण्यात आले. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. भगवान अव्हाड आणि डॉ. सुधीर येवले यांच्या गेस्ट लेक्चर चे आयोजन करण्यात आले, या बरोबरच समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार, ग्रुप किस्कशनेच आयोजन करण्यात आले.

समाजशास्त्र विभागातील डॉ. भोसले एस.ई. यांनी विविध चर्चासत्रात सहभाग घेतला या बरोबरच आंतरराष्ट्रीय जर्नल मधून शोधनिबंध प्रकाशित केला.

डॉ. शिवाजी भोसले

# हिंदी विभाग अहवाल

हमारे महाविद्यालय में छात्रों को मार्गदर्श करने में हिंदी विभाग की भूमिका महत्वपूर्ण रही है । विविध उपक्रमों से छात्रों के गुणों को हमारे विभाग में परखा जाता है ।

हमारे विभाग में विविध महापुरुषों की जयंतीया मनाई जाती है । उन महापुरुषों के गुण आचरण में लाने का संदेश हमारे विभाग में छात्रों को दिया जााता है । इस वर्ष हिंदी दिवस (१४ सितंबर २०२२) को साहित्यिक डॉ. मोनिका देवी ने अभासी पद्धति से सफल मार्गदर्शन किया । इस समारोह की अध्यक्षता महविद्यालय के प्रधानाचार्य डॉ. एन.एस. राठीजी ने निभाई । इस कार्यक्रम ला लाभ विभाग के सभी छात्रो ने लिया ।

हमारे विभाग के प्रमुख डॉ. गव्हाणे जी को इस वर्ष आचार्य चानक्य राष्ट्रिय पुरस्कार प्राप्त हो गया । इनके विविध पत्र-पत्रिकाओं में शोध-निबंध प्रकाशित हो चुके है । डॉ. चौधरी के.बी. संगोष्ठी में हिस्सा लिया उनके दो अंक में पेपर प्रकाशित हुएँ । विश्वविद्यालय में युवक महोत्सव में उन्होंने प्रमुख भुमिका निभाई तिन्ही विभाग के अनेक छात्रोंने युव मोहोत्सवमें हिस्या लिया ।

इस विभाग में निम्न प्राध्यापक कार्यकर है

१) डॉ. गव्हाणे व्ही.बी

२) डॉ. चौधरी के.बी.

३) डॉ. काझी टी.एच.

४) प्रा. ज्योती लबडे

डॉ. विष्णू गव्हाणे

# क्रिडा विभाग अहवाल

१९९६ मध्ये श्री अमोलक जैन महाविद्यालयच्या स्थापने नंतर महाविद्यालयाच्या क्रिडा विभागने क्रिडा क्षेत्रात चमकदार कामगिरी केली. महाविद्यालयाच्या स्पर्धा अतर्गत महाविद्यालय व संघाने अनेक वेळा सहभाग नोंदवला आहे, ८०० च्या वर खेळाडूंनी सहभाग नोंदवून आपली कामगीरी केली आहे, २०२२-२३ च्या वर्षी बास्केट बॉल स्पर्धत
१) स्वप्नील ढोबळे, २) अजय पवार, ३) साहील धनवटे, हे खेळाडू उदयपूर ४) कु. दिव्या जासुद हि मुलगी अहमदाबाद येथे सहभागी झाले होते, यावर्षी क्रिडामहोत्सवात या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवले, आमच्या महाविद्यालयाचे क्रिडा विषय विभगाचे प्रमुख डॉ. सय्यद जमीर यांनी संघाचे मार्गदर्शक म्हणून काम केले हाते, तसेच महाविद्यालयाचे क्रिडा विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनिल पंढरे यांची व A Side Cricket Association या महाराष्ट्राच्या संघटनेच्या सदस्यपदी नियुक्ती झाली, सदर महाविद्यालयाच्या क्रिडा विभागाच्या मानाचा तुरा खोवण्यात आला आहे.
क्रिडा विभागाच्या वतीने खेळाडूसाठी

१) इनडोअर सुविधा

२) जिमखाना

३) विविध मैदाने व इतर सुविधा

खेळाडूंना पुरवण्यासाठी पयत्नशिल आहे.

क्रिडा विभाग प्रमुख

# लोकप्रशासन विभाग

लोकप्रशासन विभाग हा महाविद्यालयामध्ये १९९६ पासून कार्यरत असून विभागामार्फत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबर त्यांचे इतरही सुप्त गुण विकसित व्हावे म्हणून सेमिनार व ग्रुपचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या स्पर्धात्मक युगामध्ये विद्यार्थ्यांना टिकून राहण्यासाठी त्यांना स्पर्धा परिक्षांसदर्भात मार्गदर्शन केले जाते याबरोबरच विभागातील शिक्षक महाविद्यालया मार्फत चालवल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन क्षेत्रांमध्ये अध्यापन करत असतात. विभागातील विद्यार्थ्यांना विषयाचे इत्यभूत शिक्षण मिळण्यासाठी त्यांची टेस्ट व रिटोरियल घेतली जाते तसेच ज्या विद्यार्थ्यांना विषयाचेज्ञान समजून घेण्यात अडचणी येतात अशा विद्यार्थ्यांना सारपडेशन केले जाते.

विभागातील प्राध्यापक यांचा विविध महाविद्यालयामार्फत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय चर्चासत्रे, परिषदामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला जातो तसेच शोधनिंबधाचेही वाचन केले जाते सन २०२२-२३ मध्ये विभागामार्फत दि. १२/०९/२०२२ रोजी अमोलक पुण्यतिथी निमित्त अमोलक प्रश्नमंजूषा आयोजित करण्यात आली होती. दि. २६/११/२०२३ रोजी ''संविधान दिन'' साजरा करण्यात आला दि. १४/०१/२०२३ रोजी विद्यापीठ नामविस्तार दिन साजारा करण्यात आला. या सर्व उपक्रमामध्ये विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सक्रिय सहभाग होता.

**डॉ. मगर एस.आर.**

# वाणिज्य विभाग

सन १९९६ पासुन महाविद्यालयात वाणिज्य विभागाचे कार्य नेत्रदिपक स्वरुपाचे आहे, वाणिज्य विभागामार्फत आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना व विद्यार्थीनींना नोकरीच्या व व्यवसायाच्या वेगवेगळ्या संधी विषय मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित केले होते. तसेच वाणिज्य विभाग संगणीप्राप्त असुन दरवर्षी विद्यार्थी हित लक्षात घेवून परिसवांद, चर्चासत्राचे आयोजन विभागामार्फत केले जाते

प्राचार्य

डॉ. नंदकुमार राठी (सर)

विभागाप्रमुख

डॉ. मदनरावजी रामभाऊ मार्कंडे

डॉ. शिंदे गोरक्षनाथ बापुराव

डॉ. मिरा नारायण नाथ

सन २०२२-२३ या वर्षी राज्य स्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय चर्चा सत्रात सहभाग घेतला व विविध विषयांवर शोधनिबंध सादर केले.

**डॉ. मार्कंडे एम.आर.**

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र सांकेतक क्रमांक २२१५५

## गांधी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा संचिलत श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान, पनालाल हिरालाल गांधी वानिज्य महाविद्यालय, कडा, ता.आष्टी, जि.बीड येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक चे सन २०२१-२०२२ मध्ये अभ्यासकेंद्र सुरु झाले या अभ्यासकेंद्रमध्ये पदवीसाठी बी.ए. बी कॉम. बी.ए. पत्रकारिता बी.सी.ए. बी.लीख आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये एम.ए. अर्थशास्त्र, एम.ए. इंग्रजी, एम.एम. मराठी, एम.ए. लोकप्रशासक, एम.बी.ए. एम. लीख, एम.एस्सी. रसायनशास्त्र, एम.एस्सी. वनस्पतीशासत्र इत्यादी विषयांस महाविद्यालयास मान्यता आहे आणि हे अभ्यासक्रम सुरळीत सुरु आहे. महाविद्यालयाचा अभ्यासकेंद्र सांकेताक क्रमांक २२१५५ असा आहे, एकूण २५० विद्यार्थी या विभागात शिक्षण घेत आहेत.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे नाशिक येथे आहे, हे विद्यापीठ १ जुलै १९८८ रोजी सुरु झाले, विद्यापीठाचे संस्थापक डॉ. राम ताकवले यांनी आपल्या कल्पक दृष्टीने आणि कार्यपद्धतीने लहुमाध्यम तत्रज्ञांनाचा उपयोग करत लोकांना त्यांच्या गरजेची कौशल्य प्राप्त करुन घेण्यासाठी आवड,सवड, व निवड याला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम तयार केले. त्यामुळे अशा प्रकारच्या शिक्षणाच्या संधी या विद्यापीठाद्वारे उपलब्ध झाल्या आहेत. देशातील या पाचव्या मुक्त विद्यापीठास यशवंतराव चव्हाण यांचे नाव द्यावे असा आग्रह कुसुमाग्रजानी धरला होता. विद्यापिठाचे गीत कुसुमाग्रज यांनी लिहीले, या विद्यापीठाचे ध्येय ‘‘लोक विद्यापीठ’’ होण्याचे आहे, विद्यापीठाचा सातत्याने अस आहे की, समाजातील ज्याच्या पर्यंत शिक्षण पोचले नाही त्यांच्यापर्यंत पोहचवून प्रमाणपत्र ते पदव्यूत्तर असे गरजेनुसार शिक्षण द्यावे एकूण ८ विभागात विभागीय केंद्र राज्यभर पसरलेली अभ्यासकेंद्रे आहेत.

